विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026



❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.१२ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

माकपचे जेष्ठ नेते सीताराम येचुरी यांचे निधन दिल्लीत एम्समध्ये घेतला अखेरचा श्वास

विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ नवी दिल्ली

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (सीपीआय-एम) सरचिटणीस सीताराम येचुरी यांचे निधन झाले आहे. सीताराम येचुरी यांनी वयाच्या ७२ व्या वर्षी दिल्लीतील एम्स रुग्णालयामध्ये अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर एम्स रुग्णालयात उपचार सुरु होते. येचुरी यांना फुफ्फुसात संसर्ग झाल्याचे सांगण्यात येत आहे. अनेक दिवस डॉक्टरांचे पथक त्याच्यावर उपचार करत होते, मात्र त्यांना वाचवता आले नाही.माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, येचुरी यांच्यावर दीर्घकाळ उपचार सुरू होते. त्यांना फुफ्फुसात संसर्ग झाला होता. येचुरी यांना १९ ऑगस्ट रोजी दिल्ली एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. न्यूमोनिया आणि छातीत संसर्ग झाल्याच्या तक्रारीनंतर त्यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले. ७२ वर्षीय येचुरी यांची प्रकृती खालावल्याने त्यांना नंतर आयसीयूमध्ये हलवण्यात आले. मात्र गुरुवारी त्यांची मृत्यूशी सुरु असलेली झुंज संपली आणि त्यांनी अखेरचा श्वास घेतला.सीताराम येचुरी यांच्या पश्चात पत्नी सीमा चिश्ती येचुरी आणि मुले अखिला आणि आशिष येचुरी असा परिवार आहे.

सीताराम येचुरी आणीबाणीच्या काळात तुरुंगात जाऊन राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली होती. डाव्या पक्षांना आघाडीच्या राजकारणात आणण्याचे श्रेयही सीताराम येचुरी यांना जाते. यूपीए वन आणि यूपीए टूच्या काळात त्यांनीच डाव्या पक्षांना सरकारचा भाग होण्यास पटवून दिले होते.

सीपीएमचे सरचिटणीस म्हणून एप्रिल २०१५ मध्ये सीताराम येचुरी यांना जबाबदारी देण्यात आली होती तर २०१६ मध्ये त्यांना राज्यसभेत सर्वोत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार मिळाला होता.

लोकसभेत अजित पवार आणि एकनाथ शिंदेंना धक्का शरद पवारांच्या पक्षाचा राष्ट्रवादी असा उल्लेख

विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ नवी दिल्ली

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांमध्ये मागील काळात ऐतिहासिक फूट पडली आणि दोन्ही पक्षांमधून आणखी दोन नवे पक्ष उदयास आले. आधी शिवसेनेत बंड झाल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्ष हा मूळ शिवसेना असल्याचं सांगत पक्षाचं नाव आणि चिन्ह शिंदे यांना दिलं. तर नंतर राष्ट्रवादीतील फुटीनंतर पक्षाचं नाव आणि चिन्ह अजित पवार यांना देण्यात आलं. मात्र लोकसभा निवडणुकीतील निकालानंतर

या दोन्ही पक्षांना धक्का बसला आणि शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील नव्या पक्षांनी दमदार कामगिरी केली. या कामगिरीचा परिणाम आता लोकसभेत पाहायला मिळत असून लोकसभा सचिवालयाने कार्यालयांचं वाटप करताना शरद पवार यांच्या पक्षाचा उल्लेख राष्ट्रवादी काँग्रेस असा केला आहे, तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा उल्लेख शिवसेना शिंदे असा केला आहे.

अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्याचा निकाल दिल्यानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाने शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे नाव दिलं होतं. मात्र लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या पक्षाने आठ जागांवर विजय मिळवला, तर अजित पवारांच्या पक्षाला अवघ्या एका जागेवर यश मिळालं. नुकतंच लोकसभा सचिवालयाकडून राजकीय पक्षांना कार्यालयांचं वाटप करण्यात आले. हे वाटप खासदारांच्या संख्येच्या आधारे करण्यात आल्याने शरद पवार यांच्या पक्षाचा उल्लेख राष्ट्रवादी काँग्रेस असा करण्यात आला, तर अजित पवार यांच्या पक्षाला कार्यालयही मिळू शकलं नाही.

दुसरीकडे, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाने नेते आमच्या पक्षाचा उल्लेख शिवसेना असाच करावा, यासाठी आग्रही असतात. मात्र लोकसभा सचिवालयाने त्यांना कार्यालय देताना त्यांचा उल्लेख शिवसेना शिंदे असा केल्याने चर्चांना उधाण आलं आहे.दरम्यान, लोकसभेत नऊ खासदार असलेल्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षालाही लोकसभा सचिवालायकडून स्वतंत्र कार्यालय देण्यात आलेलं आहे.

हिंमत असेल, तर दोन तासात..., प्रसाद लाडांचे मनोज जरांगेंना आव्हान

विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई १६

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावर मांडलेल्या भूमिकेचे देशात पडसाद उमटले. राहुल गांधींच्या भूमिकेकडे बोट दाखवत भाजप आमदार प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे पाटील यांना घेरले. जरांगे पाटलांना काही सवाल करत आमदार लाड यांनी नवे आव्हान दिले आहे.

भारतातील आरक्षण संपवण्याच्या प्रश्नाला उत्तर देताना राहुल गांधी यांनी 'सगळ्यांना समान संधी मिळायला लागतील, तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार करू. पण, तशी परिस्थिती नाही, असे उत्तर दिले. राहुल गांधींनी आरक्षण संपवण्याची भूमिका घेतल्याचे म्हणत भाजपने काँग्रेसला लक्ष्य केले आहे. याच मुद्द्याचा आधार घेत प्रसाद लाडांनी मनोज जरांगेंना आव्हान दिले.

आरक्षणाच्या बाबतीतील राहुल गांधींची विदेशात जी भूमिका आहे की, संविधान आम्ही संपवणार. ज्या पद्धतीने लोकसभा निवडणुकीत नरेटिव्ह सेट करण्याचे काम केले. आज खऱ्या अर्थाने काँग्रेसची भूमिका राहुल गांधीजींच्या तोंडून ही स्पष्टपणे, देशासमोर आणि जगासमोर आली, असे प्रसाद लाड यांनी म्हटले आहे.यामाध्यमातून राहुल गांधींना, तर प्रश्न आहेच; पण मनोज जरांगे पाटलांनादेखील माझा प्रश्न आहे. मनोज जरांगे पाटील पत्रकार परिषद घेऊन राहुल गांधींना विचारणार आहेत का? महाविकास आघाडीचा बुरखा फाडणार आहेत का? का पुन्हा एकदा म ची बाधा टाकून महाविकास आघाडीचा बुरखा घालून राहुल गांधींची साथ देणार आहेत?, असे सवाल आमदार लाड यांनी जरांगे पाटलांना केले आहेत.

शिवसेना पक्ष चिन्ह अन् नावाबद्दल सुनावणी पुन्हा लांबली

सुप्रीम कोर्टात २१ ऑक्टोबरला सुनावणी होणार

विदर्भ प्रजासत्ताक दि. १२ नवी दिल्ली

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रतेप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेल्या आहे. यावर १७ सप्टेंबरला सुनावणी होणार होती. मात्र आता ही सुनावणी पुन्हा लांबणीवर पडली असून आता सुप्रीम कोर्टात २१ ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे.

दरम्यान शिवसेना आणि राष्ट्रवादी यांच्या फुटीनंतर सर्वोच्च न्यायालयात दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात याचिका दाखल केलेल्या आहेत. या याचिकांवर तातडीने निर्णय घेण्याची विनंती उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गटाने केली आहे. पण गेल्या काही दिवसांपासून सुनावणी सातत्याने लांबणीवर पडत आहे.

यापूर्वी सुनावणी दोन आठवड्यांसाठी लांबणीवर टाकण्यात आली होती. ही सुनावणी आज होणार असल्याचे समोर आले होते. आता निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात उद्धव ठाकरे गटाच्या याचिकेवर २१ ऑक्टोबरला आता सुनावणी होईल.

एसटी महामंडळ प्रथमच १६ कोटी ८६ लाख ६१ हजार रुपयाने नफ्यात

३१ पैकी २० विभागांनी ऑगस्ट महिन्यात कमावला नफा

विदर्भ प्रजासत्ताक दि.१२मुंबई

गेली पाच ते सहा वर्ष अनेक आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या एसटी महामंडळाला सुगीचे दिवस सुरु झाले असून एसटीची आर्थिक घोडदौड चालू आहे. ऑगस्ट महिन्यात ३१ विभागांपैकी २० विभागांनी नफा कमवला आहे. या महिन्यात एसटी महामंडळाचा १६ कोटी ८६ लाख, ६१ हजार रुपये

इतका नफा झालेला आहे. तब्बल ९ वर्षांनी, ऑगस्ट-२०२४ मध्ये एसटी महामंडळ नफ्यात आल्याने मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून, भविष्यात देखील प्रयत्नांची पराकाष्टा करून महामंडळ सातत्याने फायद्यात येईल असे प्रयत्न करावे असे आवाहन केले आहे.

दोन वर्ष कोरोना महामारी आणि त्या पाठोपाठ सहा महिने कर्मचाऱ्यांचा चाललेला दीर्घकालीन संप यामुळे एस टी महामंडळ आर्थिक दृष्ट्या डबघाईला आले होते. एसटी बंद पडते की काय? अशी अवस्था निर्माण झाली होती. मे २०२२ पासून एसटीची सुरळीत वाहतूक सेवा सुरू झाली. तथापि, एसटीचा घटलेला प्रवासी पुनश्च एसटीकडे वळविणे हे मोठे आव्हान होते. यावेळी राज्य शासनाने ७५ वर्षावरील ज्येष्ठांना सर्व प्रकारच्या बसमधून मोफत प्रवास व सर्व महिलांना एसटीच्या प्रवासी तिकिटात ५० टक्के सवलत या दोन योजना सुरू केल्या, की ज्यामुळे एसटीच्या प्रवासी संख्येत भरघोस वाढ झाली. सध्या सरासरी ५४ लाख प्रवासी एसटीतून दररोज प्रवास करीत आहेत.

नागपूरच्या अपघातात माझा मुलगा असेल, तर त्याचीही चौकशी करावी; बावनकुळेंचे स्पष्टीकरण

विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ पुणे

भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते निवडणुकीत पूर्ण क्षमतेने एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या उमेदवारांमागे असतील, अशी ग्वाही भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. नागपुरातील हिट ंड रनमध्ये माझा मुलगा असेल, तर त्याचीही चौकशी व्हावी, असे पोलिसांना स्पष्टपणे सांगितले आहे, असे ते म्हणाले.

मंगळवारी रात्री बावनकुळे यांनी पुण्यातील मानाच्या गणपतींचे दर्शन घेतले. पत्रकारांबरोबर बोलताना त्यांनी सांगितले की, भाजपचे कार्यकर्ते एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या पक्षाचा प्रचार करणार नाहीत, या टिकेत काही तथ्य नाही. आमचे संघटन पूर्णपणे त्यांच्या उमेदवारांबरोबर असेल. त्यांच्याबरोबरची युती हा केंद्रातील मोदी सरकारला पुढे नेणारी आहे, यावर भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याचा विश्वास आहे, त्यामुळे भाजपचा एकही कार्यकर्ता असे करणार नाही. युतीतील प्रत्येकच पक्षाला जास्त जागा हव्यात हे स्वाभाविक आहे, याबाबतचा निर्णय वरिष्ठ स्तरावर होईल. युतीमागे लाडकी बहीण योजनेची पूर्ण ताकद उभी आहे. विरोधकांना ते समजले आहे. त्यामुळेच ते अशी टीका करत आहे, असे बावनकुळे म्हणाले.

यवतमाळ जिल्ह्यातील ८३४ बालके कमी वजनाने कुपोषणाच्या छायेत

विदर्भ प्रजसत्ताक दि.१२यवतमाळ

सुदृढ माता आणि बालकांसाठी शासनाच्या विविध योजना राबविल्या जात आहेत. याकरिता बालकांना आणि मातेलाही पौष्टिक खाद्यपदार्थ गाव पातळीवर दिले जात आहेत. यानंतरही जिल्ह्यात ८३४ बालके कुपोषणाच्या छायेत असल्याची बाब पुढे आली आहे. कमी वजनामुळे सौम्य कुपोषणाच्या छायेत असलेल्या या बालकांमुळे आरोग्य यंत्रणेसह बालकांच्या माता-पित्यांना

त्यांची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे.

जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात २६९१ अंगणवाडी आणि बालवाडी आहेत. या अंगणवाड्यांमध्ये शिक्षण घेणाऱ्या बालकांची संख्या दीड ते दोन लाखांच्या घरात आहे. या बालकांच्या आरोग्याकरिता विशेष मोहीम राबविली जात आहे. यासोबतच गावपातळीवर बालकांची विशेष काळजी घेतली जात आहे.

लसीकरण वेळेवर करता यावे म्हणून अंगणवाडीस्तरावर कॅम्प घेतले जातात. यानंतरही कमी वजनाची बालके गाव पातळीवर आढळली आहेत. यामुळे माता- पित्यांना आणि आरोग्य विभागाला विशेष दक्षता घ्यावी लागणार आहे.

आरक्षण कुणीही संपवू शकत नाही, राहुल गांधींच्या विधानाचा तीव्र निषेध: रामदास आठवलेंची टीका

विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ मुंबई

अमेरिकेत जाऊन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारतातील आरक्षण संपवण्याबाबत केलेल्या वक्तव्याचा आम्ही तीव्र निषेध करतो. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित, आदिवासी, ओबीसी, मागासवर्गीयांना संविधानाद्वारे दिलेले आरक्षण कोणीही संपवू शकत नाही. जोपर्यंत सूर्य-चंद्र आहे, तोपर्यंत भारताचे संविधान राहील. संविधानाने दिलेले आरक्षण राहील. आरक्षण संपविण्याचे बेताल वक्तव्य करणाऱ्या राहुल गांधींचा आम्ही तीव्र

निषेध करतो, असे सांगत खबरदार आरक्षण संपविण्याची भाषा कराल तर असा इशारा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना रामदास आठवले यांनी दिला आहे.

रिपब्लिकन पक्षाच्या वतीने राहुल गांधी यांच्याविरुद्ध राज्यभर निषेध आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती रामदास आठवले यांनी दिली. १३ सप्टेंबर रोजी मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात येणार आहे, असे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांनी सांगितले.

संपादकीय .....

जम्मू-काश्मीरच्या सत्तेची चावी कोणाच्या हाती?

जम्मू-काश्मीरला पंडित नेहरूंच्या काळापासून विशेषाधिकार देणारे ३९० व्या कलमाचे कवच मोदी सरकारने काढून घेतल्यानंतर प्रथमच विधानसभा निवडणुका होत आहेत. जम्मू-काश्मीरला आता कोणतेही वेगळे कायदे किंवा वेगळे अधिकार राहणार नाहीत. जम्मू-काश्मीरचा ध्वज यापुढे वेगळा असणार नाही. जम्मू-काश्मीरमध्ये देशातील कोणीही नागरिक मालमत्ता खरेदी करू शकेल, मोदी सरकारने जम्मू-काश्मीरला आता देशाच्या मुख्य प्रवाहात आणले असून तेथील जनतेची मानसिकता काय आहे.

विधानसभा निवडणुका लागणार आहेत. जम्मू- काश्मीरमध्ये १८ सप्टेंबर, २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर अशा तीन टप्प्यांत विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. निवडणुकीनंतर जनतेने निवडलेले सरकार श्रीनगरच्या तख्तावर स्थापन होईल. या निवडणुकीने लोकशाही प्रक्रियेला चालना मिळेल आणि राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल. जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेच्या ९० जागांसाठी निवडणूक होत आहे. जम्मूमधील ४३ व काश्मीर खोऱ्यातील ४७ मतदारसंघांत मतदार आपला मतदानाचा हक्क बजावतील. काश्मीरमध्ये शांतता व विकासाचा नवा अध्याय सुरू करण्यासाठी विधानसभा निवडणूक हे प्रभावी माध्यम ठरावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. जम्मू-काश्मीरला दहशतवादापासून मुक्तता मिळावी आणि युवकांना त्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी संधी प्राप्त व्हावी म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जात आहे. आजवर झालेल्या विधानसभा निवडणुकींपेक्षा यंदाची निवडणूक अगदी वेगळी आहे. सर्वच राजकीय पक्षांत अनिश्चितता आणि असंमजसपणा आहे. या निवडणुकीत मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार याची सर्वांना मोठी उत्सुकता आहे. नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी आणि काँग्रेस या तीन पक्षांत सहकार्य आणि संघर्ष अशी घालमेल चालू आहे. नॅशनल कॉन्फरन्स व काँग्रेसने विधानसभा निवडणुकीसाठी आघाडी करण्याची घोषणा केली आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि नॅशनल कॉन्फरन्सचे सर्वेसर्वा डॉ. फारूख अब्दुल्ला व माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या संयुक्त बैठकीनंतर दोन्ही पक्षांनी आघाडीची घोषणा केली. जरी ९० जागांवर आघाडी केल्याची या दोन पक्षांनी घोषणा केली असली तरी पहिल्या टप्प्यातील २४ जागांवर काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स यांच्यात जागा वाटपात बरेच अडथळे आहेत. मेहबुबा मुफ्ती यांची पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टी या आघाडीपासून दूर आहे. पण त्यांचा व फारूख अब्दुल्ला यांच्या नॅशनल कॉन्फरन्सचा अजेंडा बराच सारखाच आहे. ३७० कलम संपुष्टात आल्यानंतर अब्दुल्ला पिता-पुत्र व मेहबुबा हे दोन्ही नेते व त्यांचा पक्ष केंद्र सरकारच्या विरोधात आक्रोश करीत आहे. ओमर अब्दुल्ला हे माजी मुख्यमंत्री व मेहबुबा मुफ्ती याही माजी मुख्यमंत्री आहेत. ओमर अब्दुल्ला यांच्याविरोधात आपल्या पक्षाचा उमेदवार उभा राहणार नाही, असे त्यांनी जाहीर केले आहे.

आपला अजेंडा मान्य असेल, तर आपण आघाडीला पाठिंबा देऊ शकतो अशीही त्यानी पुस्ती जोडली आहे. यंदाच्या निवडणुकीत भाजपाने कोणत्याही राजकीय पक्षांबरोबर आघाडी केलेली नाही. मेहबुबा यांची वाट न पाहता काँग्रेस-नॅशनल कॉन्फरन्सने आघाडी जाहीर केल्यामुळे मेहबुबा यांना त्यांचा पक्ष कोणाबरोबर हा निर्णय घेणे कठीण होऊन बसले आहे.

तब्बल दहा वर्षांनी जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक होत आहेत. या काळात दहशतवाद संपुष्टात आलेला नसला तरी मोठ्या प्रमाणावर सुरक्षा दलाने मोडून काढला आहे. जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका कधी होणार याची तेथील जनता वाट बघत होती. ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये निवडणुका घेऊन तेथे लोकनियुक्त सरकार लवकर स्थापन व्हावे यासाठी काहींनी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. अखेर सर्वोच्च न्यायालयाने सरकारला मुदत घालून निवडणुका घेण्याचे आदेश दिले. भारतीय जनता पक्षाने पीडीपीबरोबर आघाडी करून या राज्यात काही काळ सत्ता उपभोगली. पण विधानसभेचे उमेदवार ठरवताना पक्षाला मोठी कसरत करावी लागली. भाजपाने जम्मू-काश्मीरसाठी ४४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पण असंतोष व खदखद बघून काही वेळातच ही यादी मागे घ्यावी लागली व नंतर केवळ १५ उमेदवारांची नवीन यादी जाहीर केली. त्यात आठ जण मुस्लीम आहेत. दुसऱ्या पक्षातून आलेल्या आयारामांना भाजपाने पहिल्या यादीत स्थान दिले होते, त्याला पक्षातून मोठा विरोध झाला. तसेच जे दोन माजी उपमुख्यमंत्री होते, त्यांची नावेच पहिल्या यादीत नव्हती. कार्यकर्त्यांचा रोष बघून भाजपाला नवीन यादी जाहीर करावी लागली.

लवकर पक्व होणाऱ्या सोयाबीनचे वाण काढणीस येणार कशी घ्याल काळजी

विदर्भ प्रजासत्ताक - लवकर पक्व होणाऱ्या वाणांचे सोयाबीनपीक आता पक्वतेकडे हळू-हळू जात आहे, तर मध्यम किंवा उशिरा पक्व होणार्या वाणांचे पिक दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे.म्हणून, सोयाबीन पिकविणार्या शेतकऱ्यांनी सद्य स्थितीत खालील उपाययोजनांचा अवलंब करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

सतत पाऊस पडत असेल तर आपल्या सोयाबीनच्या शेतातीत पावसामुळे जमा होणारे जास्तीचे पाणी काढून टाकण्यासाठी योग्य व्यवस्था करावी आणि पाणी साचल्यामुळे होणारे पिकाचे नुकसान टाळावे.

शेंगामध्ये दाणे भरण्याच्या वेळी शेंगा पोखरणार्या किडीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी इंडॉक्साकार्ब १५.८० % ई.सी. (३३३ मिली/हे.) किंवा इमामेक्टिन बेंजोएट ०१.९० (४२५ मि.ली./हे), किंवा ब्रोफ्लानिलाइड एस.सी. ३०० ग्रा/लि (४२-६२ ग्राम/हे), फ्लूबेंडियामाइड ३९.३ एस.सी (१५० मि.ली.) किंवा नोवाल्युरोन + इन्डोक्साकार्ब एस.सी. (८७५-८२५ मि.ली./हे). यापैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची फवारणी करावी.

लाल कोळीच्या नियंत्रणासाठी पिकावर मायटीसाइड (ओमाइट)ची फवारणी करावी.

ज्या शेतकर्यांनी सोयाबीनचे बीजोत्पादन घेतलेले असेल, त्यांनी आपल्या पिकावर शिफारस केलेली बुरशीनाशके (पायरोक्लोस्ट्रोबिन २०% डब्ल्यूजी (३७५-५०० ग्रॅम/हे) किंवा फ्लुक्सापायरोक्साड १६७ ग्रॅम/लि + पायरोक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅम/ली एससी (३०० मिली/हेक्टर) किंवा पायरोक्लोस्ट्रोबिन (१३३ ग्रॅम/लि.)+ इपॉक्सोकोनाझोल ५० ग्रॅम/लि. एस ई (७५० मिली/हेक्टर) किंवा टेब्युकोनाझोल २५.९ ईसी (६२५ मिलि/हे.) किंवा ३८.३९ एससी (६२५ मिली/हेक्टर) किंवा टेब्युकोनाझोल १०% + सल्फर ६५% डब्ल्यूजी(१.२५ किलो/हे.) किंवा कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्ल्यूपी (१.२५ किलो/हे). यापैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची फवारणी करावी. या फवारणीमुळे बुरशीजन्य रोगांपासून पिकाचे संरक्षण होईल.

बीजोत्पादन घेतलेल्या शेतात प्रोफेनोफॉस (१ लिटर/हे) सारख्या शिफारस केलेल्या कीटकनाशकाची फवारणी करावी, यामुळे साठवणुकीच्या दरम्यान येणार्या स्टिंक बग व भुंगेरा (पल्स बिटल) अशा हानिकारक कीटकांपासून बियाण्याचे संरक्षण होईल.

- आघारकर संशोधन संस्था, पुणे.

सकाळी रिकाम्या पोटी लवंग चघळल्याने होतात हे ५ मोठे फायदे

दि.१२विदर्भ प्रजासत्ताक

पले आरोग्य निरोगी राहावे यासाठी लोक विविध गोष्टींचे सेवन करत असतात. औषधी आणि अनेक गुणांनी भरपूर असलेले लवंग यापैकीच एक आहे.

भारतीय मसाल्यांमधील महत्त्वाचा घटक पदार्थ म्हणजे लवंग. लवंगाशिवाय मसाल्याला चव येत नाही. यामुळे जेवणाचा स्वाद वाढतो.जर तुम्ही दररोज लवंगाचे सेवन करत असाल तर यामुळे तुमच्या लिव्हरचे आरोग्य चांगले राहते.

रिकाम्या पोटी लवंग खाल्ल्याने पांढऱ्या रक्त पेशी वाढण्यास मदत होते.

जर तुमच्या दातांमध्ये त्रास होत असेल तर तुम्ही लवंगाचा वापर केला पाहिजे.

तोंडाला दुर्गंधी येत असेल तर लवंगाच्या वापराने हा त्रास दूर होतो.

लवंगामध्ये मँगनीजचे प्रमाण अधिक असते. यामुळे हाडे मजबूत होतात.

सत्तेची सर्वोच्च खुर्ची बल्लारपूरच्या लाकडाची असल्याचा अभिमान - वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

पंतप्रधान यांच्या कार्यालयाकरीता काष्ठ रवाना

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१२चंद्रपूर,अयोध्येतील प्रभु श्रीरामाचे मंदीर, लोकशाहीचे मंदीर असलेले नवीन संसद भवन, जी-२० शिखर परिषद झालेले भारत मंडपम, अशा एक ना अनेक नामांकित प्रकल्पांना बांधून ठेवणारा एक समान धागा चंद्रपूर जिल्ह्याचा आहे. तो म्हणजे या सर्व प्रसिध्द इमारतींमध्ये बल्लारपूर येथील सागवान लाकडाचा उपयोग करण्यात आला आहे. यात आणखी एक मानाचा तुरा आज (दि. १०) रोवला गेला. भारतातील सर्व नागरिकांना न्याय देणारी सत्तेची सर्वोच्च खुर्ची बल्लारपूरच्या लाकडाची राहणार आहे, याचा आपल्या सर्वांना सार्थ अभिमान आहे, अशा भावना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केल्या.

बल्लारपूर येथे महाराष्ट्र वनविकास महामंडळातर्फे देशाचे पंतप्रधान यांच्या कार्यालयाकरीता काष्ठ रवानगी करतांना वनमंत्री श्री. मुनगंटीवार बोलत होते. यावेळी वन विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंग चंदेल,भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा,प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महाराष्ट्र वनविकास

महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजीव गौड, भाजपा शहर अध्यक्ष,काशिनाथ सिंह,प्रादेशिक व्यवस्थापक सुमित कुमार, वन अकादमीचे संचालक एम.एस. रेड्डी, पियुषा जगताप, बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी किशोर जैन, सहायक व्यवस्थापक गणेश मोटकर आदी उपस्थित होते.

आजचा हा कार्यक्रम अतिशय वैशिष्टपूर्ण आहे, असा उल्लेख करून वनमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, देशाच्या सर्वोच्च नेत्यासाठी बल्लारपूर येथून काष्ठ पाठवित आहोत, हा चंद्रपूर जिल्हा, बल्लारपूर आणि वनविभागासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे. बल्लारपूरच्या लाकडापासून तयार होणा-या खुर्चीवर बसून पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाचा गौरव, विकास आणि प्रगतीचे उच्चांक गाठणार आहे, यात माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. यापूर्वी एफडीसीएम ने अयोध्येचे राम मंदीर, लोकशाहीचे मंदीर नवीन संसद भवन, जी-२० शिखर परिषद पार पडलेले ठिकाण भारत मंडपम आदींसाठी काष्ठ पाठविले आहे. या इमारतींचा प्रत्येक दरवाचा आपल्या लाकडापासून तयार करण्यात आला आहे, याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे.

शांती, प्रेम, सद्भावना, सहकार्य यासोबतच चिमूर क्रांतीचा आणि वाघांची भुमी असलेला चंद्रपूर जिल्हा आहे. या वाघाच्या भुमीतून पंतप्रधान कार्यालयासाठी ३०१८ घन फूट लाकूड दिल्लीला जात आहे. यापूर्वीसुध्दा भारत - चीन युध्दात या जिल्ह्याचे सुपूत्र तत्कालीन मुख्यमंत्री मा.सा. कन्नमवार सह्याद्रीच्या मदतीला धावून गेले. पंडीत नेहरुंच्या आवाहनाला प्रतिसाद देत भारत - चीन युध्दात सर्वाधिक सुवर्णदान चंद्रपूर जिल्ह्यानेच दिले. अशा विरतेचे, शुरतेचे आणि पराक्रमाचे प्रतिक असलेले काष्ठ बल्लारपूर येथून जात आहे

पुढे वनमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, देशात १९४२ मध्ये 'चलेजाव' ची पहिली ठिणगी चिमूरमध्ये पडली. क्रांतीची मशाल पेटविणारा हा जिल्हा आहे. त्यामुळे बल्लारपूरच्या लाकडापासून तयार होणा-या खुर्चीवर बसून 'चलेजाव आतंकवाद, चलेजाव नक्षलवाद, चलेजाव जातीयवाद' असा नारा देऊन प्रत्येक गरीबाची चिंता, त्यांच्या कल्याणाचा मार्ग या खुर्चीत बसून पंतप्रधान शोधतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट,अमरावती येथे अंतर्गत हॅकथॉन संपन्न

विद्यार्थ्यांनी कला कौशल्य दाखवत सादर केली नाविन्यपूर्ण संकल्पना

विदर्भ प्रजासत्ताक

दि. १२अमरावती - पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथे अंतर्गत हॅकाथॉन स्पर्धा नुकताच यशस्वीपणे पार पडली. हॅकाथॉनमध्ये या स्पर्धेत अभियांत्रिकी , एमसीए च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेत उत्तम कामगिरी करत तांत्रिक कौशल्ये दाखवली. सर्व अभियांत्रिकी विभाग व एमसीए विभाग मिळून एकूण ९० नावीन्यपूर्ण संकल्पना जवळपास ५५० विद्यार्थ्यांनी याप्रसंगी प्रदर्शित केल्या

अंतर्गत हॅकथॉनचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना एकत्र आणून त्यांच्यात नवकल्पनांची चाचपणी करण्याची आणि त्यांच्या तंत्रज्ञान कौशल्यांचा विकास करण्याची प्रेरणा देणे हा असतो.

हॅकथॉन स्पर्धात्मक कार्यक्रम असून विद्यार्थी मर्यादित वेळेत एकत्र येऊन एखाद्या विशिष्ट समस्याचे निराकरण करण्यासाठी नवीन सॉफ्टवेअर, हार्डवेअर, किंवा इतर तंत्रज्ञान आधारित उत्पादने तयार करतात. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक वातावरणातून बाहेर पडून प्रत्यक्षात काम करण्याची संधी अनुभवता येते. विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील करिअरसाठी आवश्यक असलेले कौशल्ये विकसित करण्यास मदत होते तसेच विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांचा वापर करून नवीन उत्पादने आणि सेवा विकसित करण्याची संधी मिळते. एकंदरीत, अंतर्गत हॅकथॉन हे विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशीलता आणि नवकल्पनांचा विकास करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ आहे. अंतर्गत हॅकथॉन मधून निवड झालेल्या या विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या स्मार्ट इंडिया हॅकथॉन मध्ये भाग घेण्याची सुवर्णसंधी मिळते. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे संचालक , प्राचार्य , उपप्राचार्य यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. झेड. आय. खान, प्रा. अभिषेक लाडोळे, प्रा अक्षय प्र. पुंडकर आधी संयोजक मंडळीनी हि स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाली.

अमरावती महानगरपालिका, अमरावती तर्फे श्री. गणेश विसर्जनासाठी आर्टीफिशीयल टँकची सुविधा

विदर्भ प्रजासत्ताक

दि. १२अमरावती - अनंत चतुर्दशीला दहा दिवसांच्या घरगुती व सार्वजनिक गणपतींचे विसर्जन होणार आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिकेने लाडक्या बाप्पाचे विसर्जन निर्विघ्न व्हावे, यासाठी सज्ज झाली आहेत.

दिनांक १७ सप्टेंबर,२०२४ रोजी अनंत चतुर्थीचे दिवशी नागरीकांच्या अडचणी लक्षात घेवून अमरावती महानगरपालिकेने श्री. गणेश विसर्जनासाठी अभियंता भवन, शेगाव नाका, सहकार नगर, ग्राऊंड, फार्मसी शासकीय विद्यालय, कठोरा नाका, आराधना बिल्डींग रिंग रोड, चाणक्य हॉटेल, नागपुर रोड, शिवाजी कमर्शियल मार्केट, रवि नगर चौक, नेहरु मैदान, प्रशांत नगर बगिचा, मालटेकडी जवळ, प्रथमेश तलाव वडाळी, छत्रीतलाव, विद्यापीठ चौक, पुलाजवळ, मोती नगर, बगीचा, साईनगर, साईमंदीर जवळ, बडनेरा, झिरी तलाव, गोपाल नगर, जीम जवळ, बडनेरा, बारीपुरा, रवी नगर, महाजनपुरा हनुमान नगर, बुधवारा या ठिकाणी

नागरीकांना आर्टीफिशीयल टँकची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. अमरावती महानगरपालिका तर्फे श्री. गणेश विसर्जनाकरीता नागरीकांच्या सोयीसाठी आर्टीफिशीयल टँक ठेवण्यात येत आहेत व प्रत्येक ठिकाणी अमरावती महानगरपालिकेने नियंत्रण अधिकारी नेमून तेथील सर्व जबाबदारी त्यांचेवर सोपविली आहे. नागरीकांनी आपल्या घरातील श्री. गणेश विसर्जन नेमून दिलेल्या जवळच्या आर्टीफिशीयल टँकमध्येच विसर्जन करावे. जेणेकरुन पर्यावरणाचा समतोल साधणेस व स्वच्छता मोहीमेस नागरीकांचा हातभार लागेल असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १२ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण

विविध मागण्यांसाठी राज्यभरातील आरटीओ कर्मचारी २४ पासून बेमुदत संपावर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती – आकृतीबंधाच्या नावाखाली कर्मचाऱ्यांचे राज्यभर समायोजन व महसूल विभागात बदली करण्याचा घाट परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य यांच्याकडून घालण्यात आला आहे. ज्याचे पडसाद संपुर्ण महाराष्ट्रातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये (आरटीओ) पहायला मिळत आहे. या अन्यायी समायोजनाविरुध्द कर्मचा:यांमध्ये प्रचंड संतापाची लाट आहे. आकृतीबंधाची पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करावी या प्रमुख मागणीसह आपल्या विविध मागण्यांच्या पुर्ततेकरिता आरटीओ विभागाच्या कर्मचाऱ्यांनी संपूर्ण राज्यभर २४ सप्टेंबर पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्धार केला आहे. मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटना आरटीओचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांनी आरटीओ अमरावती यांच्या मार्फत राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांना बेमुदत संपाबाबत नुकतीच नोटीस दिलेली आहे. मोटार वाहन विभाग आरटीओ विभागासाठी शासनाने आकृतीबंधाला दोन वर्षांपूर्वी मान्यता दिलेली आहे. याला परिवहन आयुक्त स्तरावर प्रशासन तांत्रिक बाबी शोधून कर्मचाऱ्यांच्या होणाऱ्या पदोन्नतीच्या आनंदात विरजण टाकत असल्याची भावना आता कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. एकीकडे दोन वर्षापासून आकृतीबंधानुसार वरिष्ठ पदावर पदोन्नती न देता कर्मचाऱ्यांची राज्यात आकृतीबंधाच्या नावाखाली समायोजन तर दुसरीकडे महसुल विभागनिहाय बदल्या करण्यात येत आहे. आकृती बंधानुसार पदाचे सेवा प्रवेश नियम गेल्या दोन वर्षापासून निर्णयाविनाच पडून आहेत, परिवहन आयुक्त यांच्या स्तरावर कुठलीही कार्यवाही होत नसल्याने सेवा प्रवेश नियम प्रलंबित राहत आहे, परिणामी कर्मचारी पदोन्नती पासून वंचित राहत आहे. राज्यात आरटीओच्या कामकाजा संदर्भात एकसूत्रता नसल्याने कर्मचारी वर्गास आणि विशेषत: जनतेस नाहक त्रास सहन करावा लागतो . संघटनेने मागणी केल्यानुसार गठित झालेल्या कळस्कर समितीचा अहवाल गेल्या पाच वर्षापासून बासनात बांधून ठेवलेला आहे. हा कळस्कर समितीचा अहवाल लागू करावा, तसेच संगणक प्रणालीतील संभाव्य बदलाबाबत धोरण ठरविण्यात यावे, आकृती बंधा नुसार पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती देण्यात याव्या अश्या मागण्यां करिता आरटीओ कर्मचारी २४ सप्टेंबर २०२४ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचा इशारा राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यां नी दिला आहे.या आशयाचे एक निवेदन मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अनिल मानकर यांच्या नेतृत्वात अमरावतीचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रशांत देशमुख यांना देण्यात आले. यावेळी विजय गावंडे, प्रमोद राजनेकर, संगीता भिलावेकर, महेश मेश्राम, प्रीती मेहेत्रे, अरुण वाघमारे, अनिल मेश्राम, अक्षय राठोड, आशिष माथुरकर,संजय चौधरी, जयसिंग राठोड, प्रवीण मुंगळे, साजिद अली, पराग जाधव, देवेंद्र कळमकर, समीक्षा वारकरी, दीपा पात्रे, मीनल गिरे, यशवंत रामटेके, योगेश पुसनाके, रितेश चुलेट, देवानंद खंडारे, रश्मी सोनार, सुहास वानखडे, श्वेता वैद्य, पंकज वानखडे, आशिष प्रधान, स्वप्निल खडसे, वीरेंद्र पटेल, प्रतिभा ठाकरे, अश्विनी वानखडे, दिपाली गवळी, ज्ञानेश्वर काळे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

कर्मचाऱ्यांच्या भावनांशी खेळू नका!

राज्यातल्या परिवहन आयुक्त कार्यालयाने कर्मचा:याच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार केला आहे. ज्याचे पडसाद राज्यभर पहायला मिळतील. राज्यातील कर्मचाऱ्यांच्या सहनशिलतेची परिक्षा घेवू नका. जो पर्यत यामध्ये ठोस आश्वासन शासन स्तरावरून मिळणार नाही, तोपर्यंत राज्यातील आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावरून परत येणार नाही. पुन्हा तेच ते करण्यापेक्षा'करो या मरो' ची भूमिका घेण्याची तयारी कर्मचाऱ्यांनी केली आहे. या संपूर्ण परिस्थितीला परिवहन आयुक्त तथा राज्य शासना जबाबदार राहील.–अनिल मानकर,राज्य उपाध्यक्ष,मोटर वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटना.

व्वा मानलं गुरुजी!
बँड... बाजा...आणि मिरवणूक

राज्य व जिल्हा आदर्श पुरस्कार घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी केला हटके सत्कार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ धामणगाव रेल्वे – प्रत्येकाच्या जीवनाचा स्तर सुधारण्यात शिक्षकांचा मोलाचा वाटा असतो. कारण चांगल्या–वाईट गोष्टींचा विचार करण्याची क्षमता आई–वडिलांनंतर शिक्षकच विकसित करतात. त्यामुळे गुरूंविषयी सगळे आदर व्यक्त करत असतात. विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी नुकताच राज्य पुरस्कार व जिल्हा पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर आपल्या गुरूंचा केलेला सन्मान संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

धामणगाव पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा कासारखेडा येथील श्रीकृष्ण चव्हाण यांना यावर्षी जिल्हा तथा राज्याचा आदर्श असा दुहेरी सन्मान मिळाला. यानिमित्ताने श्रीकृष्ण चव्हाण यांची मिरवणूक काढून त्यांना विद्यार्थिनी आणि ग्रामस्थांनी आगळावेगळा सत्कार केला.शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील ऋणानुबंध वेगळेच असतात. अनेक वर्षे शिक्षक आणि विद्यार्थी यांचा एकमेकांशी परिचय असतो. आपल्या शिक्षकाने कमावलेले नाव–लौकिक पाहून गावकऱ्यांना अभिमान वाटत असतो. तर, विद्यार्थ्यांनाही शिक्षकांबाबत खूप आदर असतो. विद्यार्थी आणि शिक्षकांमधील ऋणानुबंध दर्शवणारी एक घटना कासारखेडा येथे घडली आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षकाची चक्क गावातून मिरवणूक काढत हटके सत्कार केला आहे. विद्यार्थी आणि ग्रामस्थांचा त्यांच्याबद्दल खूपच जिव्हाळा निर्माण झाला आहे.श्रीकृष्ण चव्हाण हे सगळ्या विद्यार्थ्यांना हवेहवेसे वाटणारे, असे एक शिक्षक. यांनी शिक्षक म्हणून प्रामाणिकपणे आणि चोख कर्तव्य बजावलेल्या या शिक्षकाप्रती आभार व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत गावातल्या लोकांनी अनोखी मिरवणूक काढली.

या आगळ्या वेगळ्या सत्कार सोहळ्याच्या मिरवणुकीत पंचायत समिती सदस्य शुभम भोंगे,सरपंच नीलिमा पांडे,उपसरपंच शुभमजी तरोने,सदस्य प्रदीप वाघमारे,ग्रामसेवक श्री लोडाम,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीनजी येलेकार,उपाध्यक्ष शरद कामटकार,सदस्य प्रवीण पांडे,विजय ठावरे,नितेश मगर,मनीषा ठावरे,प्रणिता पांडे,पोलीस पाटील श्री दाऊतपुरे,गावातील श्री चांडक,श्री सोनवणे,रोशन मेंढूले,श्री वैद्य,रोशन पांडे,किशोर सांगोडे,नितीन नवघरे, वैभव तरोने,श्याम वैद्य, आकाश राऊत, प्रज्वल चरडे,धनंजय डोळे, शंतनू मेंढुले, विशाल तरोने,वैभव राऊत, नितीन वाघाडे,संकेत वैद्य,अभी तरोने,शिक्षिका संध्या

देशमुख,किशोर परतेकी,ओमप्रकाश धनुसकार,श्रीमती मून,अंगणवाडी सेविका श्रीमती गायकवाड,श्रीमती पुसदेकर व आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

बडनेरा मतदार संघात हि मैत्रीपूर्ण लढत घेण्याची भाजप पदाधिकाऱ्यांची वरिष्ठांकडे मागणी

तुषार भारतीयांनी दिलेत मैत्रीपूर्ण लढतीचे संकेत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती– मंगळवारी रवी राणांनी बडनेरा मतदारसंघामध्ये आपली महायुतीमधून उमेदवारी जाहीर करताना मोठे वक्तव्य करीत मी बडनेरा मतदार संघामध्ये युवा स्वाभिमान पक्षाकडून लढणार असून माझे चिन्ह पाना असल्याचे ते म्हणाले होते. मात्र त्यांच्या वक्तव्यावर भाजप नेते तुषार भारतीय यांनी आपली प्रतिक्रिया देत बडनेरा मतदार संघात सुद्धा मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे संकेत दिले आहे.

ज्या ठिकाणी तिन्ही पक्षाचे उमेदवार मजबूत आहेत त्या ठिकाणी उमेदवाराला थांबवल्याने पक्षाचे मोठे नुकसान होते. भाजपने ज्या पण २५ ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीचा जो प्रस्ताव दिला आहे तो अजित पवारांनी सुद्धा स्वीकारायला हवा. अजित पवार यांच्या उमेदवारांमध्ये जेवढा दम आहे तेवढे उमेदवार त्यांनी निवडणुकीमध्ये उतरवावेत. भाजपचे जे मजबूत उमेदवार आहेत ते उतरतील. दमदार उमेदवाराला थांबवणे म्हणजे महायुतीचे नुकसान आहे, असे राणा म्हणाले. त्यावर भारतीय यांनी हि भाजपा बडनेरा मतदार संघात मैत्रीपूर्व लढत लढण्याच्या तयारीत असल्याचे सांगतिले.राणांनी सुद्धा मैत्री पूर्ण लढतीचा प्रस्ताव मान्य करावा व राणांमध्ये जेवढा दम आहे तेवढा त्यांनी लावावा मात्र मैत्री पूर्ण लढतीचा प्रस्ताव मान्य करावा असेही भारतीय म्हणालेत.

भाजपने ज्या पंचवीस जागा मागितल्या आहेत त्यामध्ये अमरावतीसह बडनेरा मतदारसंघआहे. बडनेरा मतदारसंघामध्ये महायुतीचा मी उमेदवार आहे. मला देवेंद्र फडणवीस यांनी हिरवी झेंडी दिली असल्याचे राणा सांगत जरी असले तरी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बडनेरा मतदार संघात मैत्रीपूर्ण लढत घ्यावी अशी मागणी वरिष्ठांकडे केली आहे.आणि भाजपा या वर गांभीर्याने विचार करीत असल्याचे काही पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता बडनेरा मतदार संघात महायुतीचे उमेदवार म्हणून रवी राणा राहणार कि भाजप मैत्रीपूर्ण लढत करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांना मिळालेल्या २६ हजार ७६३ मताधिक्यांचा आधार घेत बडनेरातून भाजप आणि शिंदे सेना इच्छक उमेदवारांकडून दावेदारी केली जात होती. मात्र, आता राणांच्या या निर्णयामुळे भाजप, शिंदेसेनेची दावेदारी कागदावर तर नाही ना, याविषयी जोरदार चर्चा होत आहे.

रवी राणा यांचे मानसिक संतुलन बिघडल्याचे लक्षण – तुषार भारतीय

अमरावतीसह बडनेरा मतदारसंघआहे. बडनेरा मतदारसंघामध्ये महायुतीचा मी उमेदवार आहे. मला देवेंद्र फडणवीस यांनी हिरवी झेंडी दिली असल्याचे राणा सांगत आहे याचा अर्थ राणा यांचे मासिक संतुलन बिघडले असल्याचे स्पस्ट संकेत आहे कारण अजून जागा वाटपाबाबत वरिष्ठ पातळीवर कोणतीच चर्चा झाली नाही राणा ज्या गावात जातात त्या त्या गावात ग्रामस्थ राणांना कामाबद्दल प्रश्न विचारत आहे त्यामुळे त्यांच विधान हास्यस्पद आहे आणि केवळ संभ्रम निर्माण करण्यासाठी त्याचे हे वक्तव्य आहे आमचा देवेंद्र फडणवीसांवर पूर्ण विश्वास आहे.

ऑक्टोबरमध्ये लांबणार नाही, वेळेतच परतेल मान्सून

नवरात्रात वळीव पावसाची शक्यता

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती– सध्या सक्रिय झालेल्या 'ला–निना' च्या प्रभावामुळे यंदा सप्टेंबरसह ऑक्टोबरमध्येही जोरदार पाऊस होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र या अंदाजाला सध्यातरी कोणताही आधार नसल्याने मान्सून ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवाड्यात आपल्या नियोजित वेळी महाराष्ट्रातून निघून जाईल, असा अंदाज हवामान विभागाचे निवृत्त अधिकारी माणिकराव खुळे यांनी व्यक्त केला आहे.शक्यतो ऑक्टोबर महिन्याच्या मध्यावर म्हणजे १५ ऑक्टोबरनंतर मोसमी पाऊस देशातून निघून जातो व दक्षिण भारतातील चार राज्यात तो ईशान्य किंवा हिवाळी पाऊस या नावाने तो सुरु होतो. ऑक्टोबर महिन्यात बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाचा काळ सुरू होतो. ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवाड्यात प्रत्यक्षात मान्सून महाराष्ट्रातून परतीचा प्रवास सुरु करतो. म्हणजे साधारण ५ ऑक्टोबरला माघारी परतत असतांना महाराष्ट्राच्या उत्तरेकडे प्रवेशतो व १५ ऑक्टोबरपर्यंत तो महाराष्ट्रातून बाहेर पडतो. याच दरम्यान महाराष्ट्रात मान्सूनच्या शेवटच्या आवर्तनाचा पाऊस होत असतो. तसाच पाऊस यावर्षी ९ ते १३ दरम्यान पडण्याची शक्यता जाणवते. म्हणजेच घटस्थापनेच्या सातव्या दिवसापासून कदाचित महाराष्ट्रात वळीव स्वरूपाच्या मध्यम पावसाची शक्यता माणिकराव खुळे यांनी व्यक्त केली आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात पावसाची शक्यता कमी असते व या काळात थंडीची चाहूल जाणवते.

दरम्यान सध्या सक्रिय झालेल्या ला–निनाच्या प्रभावामुळे सप्टेंबरमध्ये जोरदार पावसाची शक्यता हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. हा पाऊस ऑक्टोबरमध्येही लांबेल, असेही भाकीत करण्यात आले आहे. याशिवाय हवामान बदलाच्या प्रभावाने मान्सूनचा काळ पुढे सरकत असून यंदा उशीरा सुरू झाल्याने तो पुढे ऑक्टोबरपर्यंत लांबेल, असेही मत व्यक्त केले जात आहे. मात्र ला–निनामुळे किंवा हवामान बदलाच्या प्रभावाने यंदा मान्सून लांबेल, अशा अंदाजाला सध्यातरी काही वैज्ञानिक आधार नसल्याचे स्पष्ट मत खुळे यांनी व्यक्त केले. त्यामुळे ऑक्टोबर महिन्यात महाराष्ट्राच्या कोणत्या भागात सरासरीच्या कमी किंवा जास्त किंवा सरासरी इतका पाऊस पडू शकतो, याचे भाकीत १ ऑक्टोबरच्या दरम्यानच व्यवस्थित सांगता येईल.

प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी घेतली विभागीय आयुक्तांची सदिच्छा भेट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणीच्या प्रकल्प अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी आज विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांची सदिच्छा भेट घेतली.

श्रीमती म्हाडदळकर या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या २०२२ च्या तुकडीच्या भारतीय प्रशासकीय सेवेच्या अधिकारी असून नुकतेच आठवड्यापूर्वी त्या धारणी येथील प्रकल्प अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी पदावर रुजू झाल्या आहेत.

यावेळी विभागीय आयुक्तांनी धारणी प्रकल्प अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम, आदिवासी बांधवांच्या मागण्या आदीबाबत श्रीमती म्हाडदळकर यांच्याकडून आढावा घेतला. आगामी काळात मेळघाट परिक्षेत्राच्या विकासासाठी कुठल्या उपाययोजना प्राथम्याने राबविणार यासंदर्भात चर्चा केली.

कामाख्या देवी मंदिर देखाव्याला भाविकांची पसंती

अनुप अग्रवाल यांचे उत्कृष्ट नियोजन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती – राजापेठ परिसरातील शहीद भगतसिंग मंडळाच्या देखाव्याचे आमदार रवी राणा व पोलीस आयुक्त नवीन चन्द्र रेड्डी यांचे शुभहस्ते रविवारी अत्यंत थाटात,जल्लोषात उदघाटन करण्यात आले गुवाहाटी येथील नवसाला पावणाऱ्या सुप्रसिद्ध अश्या कामाख्या देवी मंदिर देखावा भाविकांच्या सेवेत लोकार्पित करण्यात आला भाविकांची गर्दी या ठिकाणी होत आहेआमदार रवी राणा व पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी उपायुक्त गणेश शिंदे यांचे हस्ते हजारो भाविकांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष अनूप अग्रवाल व त्यांच्या सहकाऱ्यांचे अत्यन्त शिस्तबद्ध व उत्कृष्ट नियोजनगणेशोस्तवाचे माध्यमातून समाज प्रबोधन व्हावे व सामाजिक उपक्रम राबवून मंडळांनी आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे,अमरावती बडनेरा व जिल्ह्यातील प्रत्येक सार्वजनिक गणेश मंडळांना भेटी देऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणार असल्या हे यावेळी आमदार रवी राणा म्हणालेत तरनागरिकांनी कायदा सव्यवस्था पाळून कुणाच्याही भावना न दुखावता अत्यन्त आनंदाने गणेशोत्सव साजरा करावा,भक्ती शक्ती चा अनोखा संगम म्हणजे गणेशोत्सव परंपरां व संस्कृती जोपासणे हे प्रत्येक मंडळाचे कर्तव्य असल्याचे मनोगत पोलिस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी यांनी यावेळी केले यावेळी आ.राणा व पोलीस आयुक्त रेड्डी यांच्या हस्ते बाप्पांची महाआरती करण्यात आली

नंतर सर्व भाविकांना भोजन प्रसाद देण्यात आला,व रोज आरतीनंतर भोजन प्रसाद वितरित करण्यात येईल असे मंडळाचे वतीने जाहीर करण्यात आलेआरती नंतर फटक्यांची आतिषबाजी व ढोल ताश्यांचा गजर करण्यात आला.

अमृत -२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या ८६५.२६ कोटीच्या निविदेस शासनाची मान्यता

आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या प्रयत्नाने मुबलक पाणी पुरवठ्यातून शहराला मिळणार जलसंजीवनी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

अमरावती शहराला वर्ष २०५५ पर्यंतच्या लोकसंख्येला मुबलक व नियमित जलपूर्ती करण्याचे व्हिजन बाळगून अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी अमृत -२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेचा महत्वाकांक्षी प्रकल्प शासनाकडून मंजूर करून आणला आहे. सदर योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याला घेऊन आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांचा शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरु असतांना नुकतेच दिनांक ०३ सप्टेंबर २०२४ रोजी नगरविकास विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीमध्ये अमृत - २ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी ८६५.२६ कोटीच्या खर्चाच्या निविदेस मान्यता देण्यात आली आहे. या बद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी शासनाचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

अमरावती शहराला मुबलक व नियमित पाणी पुरवठ्या संदर्भात आ. सौ. सुलभाताई खोडके यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न सुरु असून मागील ७ जानेवारी २०२२ रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात बैठक घेतली. अमरावती शहराला पाणी पुरवठा करणारी अप्पर वर्धा धरण मोर्शी ते नेरपिंगळाई पर्यंतची डब्लूटीपी पाईप लाईन जुनी लोखंडी असून शिकस्त झाली आहे. या गुरुत्व वाहिनीचे ३० वर्षाचे आयुष्यमान संपुष्टात आल्याने वारंवार गळती लागत आहे. एक गळती दुरुस्त करण्यासाठी चार ते पाच दिवस लागत असल्याने नागरिकांना पाणी पुरवठ्याबाबत गैरसोय निर्माण होते. म्हून सद्या शहराला एकदिवस आड व कमी दाबाने पाणी पुरवठा केला जात आहे.अशी बाब बैठकीत प्रकर्षाने समोर आली होती. यावर उपाययोजना करण्यासाठी केंद्र शासनाची अमृत- २ ही एक योजना असल्याने ती अमरावती यामध्ये कार्यान्वित करण्याला घेऊन दिनांक २५ एप्रिल २०२२ तसेच दिनांक २८ एप्रिल २०२३ रोजी मजीप्रा बैठकीत मंथन झाले असता कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प अमरावतीत राबविण्यासंदर्भात आमदार महोदयांनी ठोस भूमिका घेऊन तसा प्रस्ताव शासकडे पाठविण्याची सूचना मजीप्रा प्रशासनाला करण्यात आली.

दरम्यान गेल्या मार्च २०२३ च्या अधिवेशनात मुद्दा उपस्थित करतांना या योजनेला प्रस्ताव कधी मान्य करणार ? असा प्रश्न लावून धरीत शासनाचे लक्ष वेधले होते .

यावर मुख्यमंत्री महोदयांच्या वतीने सभागृहात निवेदन देतांना मंत्री ना.उदय सामंत यांनी राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समिती पुढे हा प्रस्ताव सादर करून केंद्र शासनाकडे शिफारस करणार असल्याचे सभागृहात सांगितले होते. दरम्यान आमदार महोदयांनी शासनाकडे पाठपुरावा केला तसेच राज्याचे



उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांना सुद्धा अवगत केले होते.

दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी याबाबत राज्य स्तरीय उच्चाधिकारी समितीचे प्रमुख तथा राज्याचे मुख्य सचिव यांना आपल्या दालनात बोलावून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने या संदर्भातील कार्यवाही जलद गतीने पूर्ण करून केंद्र सरकारकडे शिफारस करण्याबाबत योग्य निर्णय घेण्याच्या सूचना मुख्य सचिवांना केल्या होत्या.तदनंतर गेल्या ५ जुलै २०२३ रोजी राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीची बैठक झाली असता अमृत २ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व एकूण ९८५.४९ कोटींच्या अमृत २ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत केंद्र शासन ३२८.४८ कोटी इतका भार उचलेल व उर्वरित रक्कम राज्य शासनाकडून खर्च करून हा महत्वाकांक्षी प्रकल्प पूर्णत्वास आणणार आहे. असा निर्णय घेऊन राज्य उच्चाधिकार समितीच्या वतीने केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात आली. दरम्यान १० जानेवारी २०२४ रोजी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत गठीत करण्यात आलेल्या राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक नगरविकास सचिवांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली असता सदर प्रकल्पाला तांत्रिक समितीने मान्यता प्रदान केली होती.तर दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी केंद्र पुरस्कृत अमृत-२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना ९८५.४९ कोटींच्या प्रकल्पाला केंद्र सरकारच्या शिखर समितीची मान्यता मिळाल्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.अशातच या संदर्भातील निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याला घेऊन हालचाली सुरु असतांना राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांनी सदरच्या योजनेचा आढावा घेत निविदा मंजूर करून नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय तांत्रिक समितीकडे शिफारस केली होती.

या शिफारशीच्या अनुषंगाने आता नुकतीच ३ सप्टेंबर २०२४ रोजी प्रधान सचिव नगर विकास विभाग तथा राज्यस्तरीय तांत्रिक समितीचे अध्यक्ष गोविंदराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत योजनेच्या अमृत -२ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेसाठी ८६५.२६ कोटी निविदेस मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. तसेच अमृत २ अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत केंद्र शासन ३६.३३ टक्के इतका भार उचलेल व राज्य शासनाकडून ३६.६७ टक्के इतका शासन वाटा देणार असून उर्वरित ३० टक्के इतका भार मजीप्रा उचलणार आहे.तर अमरावती महानगर पालिका कुठलाही भार उचलणार नसल्याचे समितीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.अमरावतीला वर्ष २०५५ पर्यंत नियमित व मुबलक पाणी पुरवठा मिळण्याला घेऊन अमृत २ योजनेच्या कामासाठी ८६५.२६ कोटींच्या निविदेस मान्यता मिळाल्याने आता लवकरच सिंभोरा हेडवर्क्स ते नेरपिंगळाई संतुलन टाकी पर्यंतच्या मृदू पोलादी जलवाहिनी अंथरणेचा कामाला सुरुवात होणार आहे. या बद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी महाराष्ट्र शासनाचे तसेच या सर्व प्रक्रियेत विशेषतः लक्ष घालून सातत्याने पाठपुरावा करून अमरावतीकर जनतेच्या पाणी पुरवठ्या संदर्भात अमृत २ योजनेचा जिव्हाळ्याचा विषय मार्गी लावल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचे सुद्धा आ. सौ.सुलभाताई खोडके यांनी आभार मानीत अभिनंदन केले आहे.

वझ्झर मॉडेल देशभरात लागू करणार - अभ्यासाकरिता चमू झाली दाखल

खा. डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रयत्नाला यश..

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती - खा. डॉ. अनिल बोंडे यांनी पद्मश्री श्री शंकरबाबा पापडकर यांच्या वझ्झर मॉडेल संपुर्ण देशभर बेवारस, बेसहारा, दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता अपंग मुलांकरिता लागू करण्यात यावे, आणि त्याद्वारे त्या मुलांचा शोषण होणार नाही असा प्रस्ताव स्पेशल मेन्शनमध्ये राज्यसभेमध्ये मांडला होता. त्याचे अनेक खासदार यांनी अनुमोदन केलेले होते. या स्पेशन मेन्शन मध्ये बाबींची केंद्र शासनाने दखल घेवुन अचलपुर येथील वझ्झर येथे केंद्रशासना च्या सामाजिक न्याय विभागाची चमू पाठविली आणि अभ्यास करण्याकरिता त्यांनी कार्यवाही सुरु केली. पद्मश्री श्री शंकरबाबा पापडकर यांनी या वझ्झर मॉडेल च्या संदर्भात सर्व तज्ञ चमूला मार्गदर्शन केले, माहीती दिली, मुलांच्या भेटी करुन दिल्या आणि वझ्झर मध्ये ज्या पध्दतीने काम चालते आहे. त्याप्रामणे गतीमंद, मतीमंद, बेसहारा, मुलांच जीवन सुरक्षित व सुखमय झालेले आहे, ते त्यांना दाखवुन देण्यात आले.

पद्मश्री श्री शंकरबाबा पापडकर यांच्या विशेष कार्याकरिता मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सम्मान दिला व राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते श्री शंकरबाबा पापडकर यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. मा. प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या बोलतांना श्री शंकरबाबा पापडकर यांनी इच्छा प्रकट केली होती, त्याप्रमाणे बेवारस आणि गतीमंद, मतीमंद मुलांना ज्याप्रमाणे वझ्झर ला सेवा देण्यात येत आहे. त्याप्रमाणे इतरत्र संपुर्ण भारतामध्ये सेवा देण्यात यावी व सुरक्षित ठेवण्यात यावे. त्यासोबतच राज्यसभेच्या अधिवेशानामध्ये डॉ. अनिल बोंडे यांनी स्पेशल मेन्शनमध्ये हा मुद्दा उपस्थित करुन संपुर्ण केंद्र शासनाचे लक्ष वेधले आणि त्याचा परिणाम म्हणून केंद्र शासनाचे मंत्री श्री विरेंद्र कुमार यांनी आपले सचिव स्तरावरचे अधिकारी पाठवले आणि एका महिन्याच्या आत ते अहवाल सादर करणार आहे. यापासून अपेक्षा वर्तविल्या जाते आहे की , वझ्झर मॉडेल मध्ये ज्याप्रमाणे बेवारस, बेसहारा, गतीमंद, मतीमंद मुलांना सहारा दिल्या जातो, त्यांचे संरक्षण केल्या जाते, त्यांच पालन-पोषण केल्या जाते, त्यांना नाव सुध्दा दिल्या जाते. त्याप्रमाणे संपुर्ण भारतामध्ये वझ्झर चे मॉडेल विकसित करुन या सर्व एक लाख मुलांचे संरक्षण केल्या जावं आणि याला मान्यता मिळवुन नविन कायद्यामध्ये रुपांतर निश्चितपणे केल्या जाणार आहे असा विश्वास डॉ. अनिल बोंडे यांनी व्यक्त केलेला आहे

भेगा पडलेल्या पुलाची आमदार रवी राणा यांनी केली पाहणी

संबंधित कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे दिले आदेश

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा बडनेरा अमरावतीला जोडणारा पूलाला काही दिवसाअगोदर फार मोठ्या प्रमाणात भेगा पडल्यामुळे बडनेरा शहरातील नागरिकांनी यासंदर्भातील तक्रार बडनेराचे आमदार रवी राणा यांच्याकडे केली होती.आमदार रवी राणा यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत घटनास्थळावर पोहोचून पुलाची पाहणी केली असता त्यांनी या सर्व प्रकाराला दोषी असणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश दिले.राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा बडनेरा अमरावतीला जोडणाऱ्या पुलाचे मागील दोन वर्षांपासून संथगतीने काम सुरू आहे. जागोजागी केलेल्या खड्ड्यामुळे पुलावर मोठ्याप्रमाणात पाणी साठवले गेले होते. त्यामुळे पुलामध्ये मोठ्याप्रमाणात भेगा पडल्या. त्यामुळे केव्हाही दुर्घटना होऊन मोठे नुकसान होऊ शकते, असे नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी या संदर्भात आमदार रवी राणा यांच्याकडे तक्रार केली. आमदार राणा यांनी याची दखल घेत पुलाची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विशेषता महारेल या कंपनीचे कंत्राटदार, महाराष्ट्र रेल्वे महामंडळ अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनाचांगलेच धारेवर धरत कंत्राटदार तसेच ठेकेदार यांच्यावर बडनेरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांना या सर्वांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. यासंदर्भातील तक्रार बडनेरातील स्थानिक नागरिक देत असल्याचेसुद्धा या ठिकाणी आमदार रवी राणा यांनी सांगितले. कुठलीही जीवहानी झाल्यास त्याला सर्व परीने महारेलचे सर्व कंत्राटदार सुपरवायझर आणि संबंधित अधिकारी जबाबदार राहणार असल्याचे आमदार रवी राणा यांनी यावेळी सांगून पुलाचे काम जलदगतीने करण्याकरिता निर्देश सुद्धा बजावलेले आहे.

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेवर प्रश्नचिन्ह

जिल्ह्यातील साडेपाच लाख महिलांना मोफत सिलेंडर ची प्रतीक्षा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती - मार्च २०२५ पूर्वी मोफत ३ सिलींडर पुरवण्याच्या मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेवर प्रश्नचिन्ह लागले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेपाठोपाठ सरकारने ३० जुलै रोजी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. परंतु प्रत्यक्ष कार्यपद्धती अद्यापही यंत्रणेकडे पोचली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील ५ लाख १७ हजार १४ महिला पहिल्या मोफत सिलिंडरची प्रतीक्षा करीत आहेत.

यंत्रणेच्या मते उज्वला योजनेच्या संपूर्ण तर मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील गॅस कनेक्शनधारक महिला यासाठी पात्र आहेत. त्यांचेमॅपींग राज्य सरकार आणि गॅस कंपन्यांच्या स्तरावर सुरु आहे. ते एकदाचे पूर्ण झाले की सदर योजनेचा लाभ देणे सुरू होईल. दरग पात्र महिला गॅस वितरकांकडे चौकशीसाठी गर्दी करीत असल्याने त्यांची डोकेदुखी वाढली आहे. उज्वला गॅस योजनेसाठी पात्र ठरलेल्या १ लाख ६७ हजार १४ आणि लाडकी बहिण योजनेतील ६ लाख ७० हजार महिलांपैकी ३ लाख ५० हजार महिला या योजनेसाठी पात्र आहेत. त्यामुळे या महिलांनी मोफत सिलींडरसाठीची मागणी सुरु केली आहे. परंतु संबंधितांकडे त्यांची यादी अद्याप पोचली नाही, त्यामुळे त्यांचा हिरमोड होत आहे. गॅस वितरक आणि गॅस कंपन्यांच्या मते या योजनेसाठीच्या पात्र लाभार्थ्यांची नेमकी यादी अद्याप त्यांच्याकडे पाठविण्यात आली नाही. त्यासाठीचे मॅपींग राज्य स्तरावर सुरु आहे. ते एकदाचे पूर्ण नाले की त्यांना लाभ दिला जाणार हे.उज्वला गॅस योजनेच्या लाभार्थी महिलांचा डेटा शासन आणि गॅस कंपन्यांकडेउपलब्ध आहे. परंतु शासनाने लाडक्या बहिण योजनेतील ज्या महिलांच्या नावे गॅस कनेक्शन आहे, त्यांनाच या योजनेचा लाभ देण्याचे ठरविले असल्यामुळे हा गुंता अधिक वाढला आहे. यासाठी आधी जिल्ह्यातील ६ लाख ७० हजार महिलांपैकी ज्या साडे तीन लाख महिलांच्या नावे गॅस कनेक्शन आहे, त्यांची नावे निश्चित करणे आवश्यक आहे. एकदा ही प्रक्रिया पूर्ण झाली की सदर महिलांच्या बँक खात्यात सिलींडरची संपूर्ण रक्कम (८३० रुपये) राज्य शासनातर्फे जमा केली जाईल. सध्या उज्वला योजनेतील महिलांनी सिलींडर विकत घेतल्यानंतर केंद्र शासनातर्फे त्यांना ३०० रुपयांची सबसिडी दिली जाते.

जयकुमार बेलखडे यांचा बच्चू कडू यांच्या उपस्थितीत प्रहार पक्षात प्रवेश

वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा निवडणुक प्रहार पक्षाकडून लढणार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती - वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधान सभेतील स्वराज्य शेतकरी संघटनेचे अध्यक्ष जयकुमार बेलखडे यांनी आज आमदार बच्चू कडू यांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांसह प्रहार पक्षात प्रवेश भेट घेतला आहे, जयकुमार बेलखडे हे प्रहार पक्षाकडून आर्वी विधानसभा निवडणूक लढणार असल्याचे सांगितले आहे, जयकुमार बेलखडे यांनी स्वराज्य शेतकरी संघटनेच्या माध्यमातून आर्वी विधानसभेत मोठे संघटन निर्माण केले आहे गेल्या महिन्यापूर्वी त्यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली होती त्यानुसार ते मनसे पक्ष्यात प्रवेश करणार

असल्याचे बोलले जात होते मात्र आज त्यांनी कार्यकर्त्यांसह बच्चू कडू यांच्या कुरळपूर्णा येथील निवासस्थानी प्रहार पक्षात प्रवेश केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे

शिव्यामुक्त समाजासाठी कुलगरुंसह सर्व मान्यवरांनी घेतली शपथ

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गाडगे बाबा अध्यासनातर्फे आयोजित कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलिंद बारहाते यांचेसह उपस्थित मान्यवरांनी संविधानाच्या मूल्यांचा आदर व मूलभूत कर्तव्यांचे पालन करण्याची, कोणताही भेदभाव न करता सर्व व्यक्तींचा आदर करण्याची, सुसंस्कृत समाजासाठी आणि लिंगभाव

समानतेसाठी प्रयत्नशील राहण्याची, माता-भगिनींचा व एकुणच स्त्रीत्वाचा अनादर करणार्या-, शिव्यांचा वापर न करण्याची व संविधानिक मार्गाने शिव्यामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी प्रयत्नशील राहण्याची शपथ घेतली. यावेळी गाडगेबाबा मिशन, मुंबईचे उपाध्यक्ष बापूसाहेब देशमुख, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर, विदर्भ महारोगी सेवामंडळ तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे, माजी प्र-कुलगुरु डॉ. जामोदे, डॉ.पी.आर. राजपूत, राजेश पिदडी, डॉ. विलास नांदूरकर, डॉ. दिलीपसिंह खामरे, जेष्ठ नागरिक संघाचे पुरुषोत्तम गावंडे, डॉ. कल्याणकर, डॉ.एम.टी. देशमुख, मआविम चे सुनील सोसे, डॉ. अरुण धनवटे, डॉ. सतिश तराळ, डॉ. अनिल मराठे, डॉ. किशोर हुरडे, प्रा. एकनाथ तट्टे, प्राचार्य महाजन, वंदना चौधरी, मनजीतसिंग, डॉ. राजेश मिरगे, डॉ. बनसोड, डॉ.बी.आर. देशमुख, डॉ. भोजराज चौधरी, डॉ. राजकुमार दासरवाड, विजय सवाई, बंकटलाल राठी, राजेश जोशी, प्राचार्य दाभाडे, डॉ. दिनकर वाकडे, श्री आठवले, श्री गजानन कडू यांचेसह जवळपास ७० सामाजिक शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींनी शपथ घेतली.

परवानगी ५० ची, वाजवला ७० डेसिबलपर्यंत

डीजेच्या कर्कश आवाजापासून नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

डीजेच्या कर्कश आवाजामुळे उद्भवणाऱ्या समस्या लक्षात घेता, काही अटी व शर्ती घालून डीजेची परवानगी दिली जाते. यामध्ये ७० डेसिबलपर्यंत डीजेचा आवाज ठेवण्यास परवानगी आहे. परंतु, काही दिवसांपूर्वी शहरात स्पर्धेमध्ये डीजेचा आवाज हा ७० डेसिबलपेक्षा जास्त राहिल्याचे बोलले जात आहे. परंतु, प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई या आवाजाच्या अनुषंगाने झालेली नाही. सद्या सन उत्सवांचे दिवस असल्याने डिजेच्या आवाजावर नियंत्रण ठेवावे. अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. डीजेच्या मोठ्या आवाजामुळे श्रवणशक्तीवर परिणाम होऊन कमी ऐकू येणे. तसेच कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. हृदयावर कर्णकर्कश डीजेचा विपरीत परिणाम होऊन हृदयविकार, चिडचिडेपणा, मानसिक विकार, शारीरिक विकार होण्याची दाट शक्यता आहे. जास्त डेसिबल

आवाज असणाऱ्या डीजेमुळे लहान बालके, गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक, हृदयविकार असणाऱ्यांना मोठा त्रास होतो. कानाचा पडदा कायमचा निकामी झाल्याच्या घटना पण ताज्या आहेत. दवाखाना, शाळा, आदी ठिकाणी डीजे वाजवण्यास प्रामुख्याने बंदी असली, तरी त्या ठिकाणी बिनधास्तपणे डीजे वाजवला जातो. अनेक वेळा विविध कार्यक्रमांमध्ये परवानगी न घेताही डीजे वाजवला जातो. शहरात तसेच ग्रामीण भागात काही राजकीय पुढाऱ्यांकडून दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु, या डीजेच्या आवाजावर प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष होते. त्यामुळे या आवाजाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्याला धोकादायक आहे.

डीजेला किती डेसिबलपर्यंत परवानगी? डीजेसाठी औद्योगिक परिसरात ७५ डेसिबल, व्यावसायिक परिसरात ६५, रहिवासी परिसरात ५५, शांत परिसरात ५० डेसिबलपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. परंतु, या नियमांचे कुठेही पालन होत नसल्याचे चित्र पाहायला मिळते.

पर्यावरणपूरक उपक्रमातून मातीपासून बनवले गणपती आयोजकांकडून विजेत्यांना बक्षिसे, प्रमाणपत्रे वाटप

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२शे.घाट

नगरपरिषद शेंदुरजनाघाट द्वारा 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत पर्यावरणपूरक उपक्रमाच्या माध्यमातून मातीपासून गणपती बनवणे स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यातील विजेत्यांना बक्षिसे तर सहभागी झालेल्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

नगरपालिकेच्या प्रतिनिधींनी गणपतीच्या मूर्तीचे

परीक्षण केले. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. सुंदर व आकर्षक अशा मातीच्या गणपती मुर्त्या विद्यार्थ्यांनी बनवून आणल्या होत्या तसेच डेकोरेशनही छान केले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण नुकतेच करण्यात आले. या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी शहर समन्वयक विक्रम खोडके यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा 'श्री गणेशा' केला. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना पर्यावरणातील प्रदूषणाची माहिती दिली आणि स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण केले.

या स्पर्धेमधे प्रथम क्रमांक रीहांत प्रफुल्ल अकर्ते वर्ग चौथा, द्वितीय क्रमांक आराध्य अतुल चौधरी वर्ग दुसरा तर तृतीय क्रमांक यज्ञा भूपेंद्र कुवारे हिने पटकावला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांनासुद्धा प्रोत्साहनपर भेट वस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुणा निंभोरकर यांनी केले तर आभार मेघा मोरे यांनी मानले. कार्यक्रमाला स्वच्छतादूत प्रतीक खडसे व महेंद्र खडसे उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना मोघे, गायत्री आंडे, शुभांगी पांडे, मंजुषा अकर्ते, हिना खान, वैभव सावरकर, माधुरी सुपले, वनिता वानखडे आदी उपस्थित होते.

सीताबाई संगई कन्या शाळेच्या विद्यार्थिनी विभागीय ज्युदो स्पर्धेत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अंजनगाव सुर्जी

शालेय जिल्हास्तरीय ज्युदो क्रीडा स्पर्धा नुकत्याच शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे पार पडल्या. ज्युदो स्पर्धेसाठी १४,१७,१९वर्ष वयोगटातून जिल्ह्यातील अनेक शाळांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये विविध वजन गटामधून सीताबाई संगई

कन्या शाळेच्या विद्यार्थिनी सरस ठरल्या. व १९ वर्ष वयोगटातून राणी अरबाड, रावी काळमेघ, १७ वर्षे वयोगटातून श्रुती तळोकर, श्रावणी नेमाडे व १४ वर्षे वयोगट मधून स्वरा भेलांडे या पाच मुलींची निवड विभागीय ज्युदो स्पर्धेसाठी झाली. या सर्व मुली विभागीय स्पर्धेसाठी यवतमाळ येथे दिनांक १९ सप्टेंबर रोजी जाणार असून, या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अविनाश संगई, उपाध्यक्ष डॉ.उल्हास संगई, सचिव विवेक संगई, सहसचिव प्रसाद संगई, अजय संगई व सर्व संचालकांसह मुख्याध्यापक उत्तम मुरकुटे, पर्यवेक्षिका नीलिमा सांगोळे, शिक्षक – शिक्षिका या सर्वांनी यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक केले.व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या मुलींना कन्या शाळेचे क्रीडाशिक्षक समाधान शेटफळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

दारूच्या नशेतील आईच्या अंगाखाली दबल्याने २१ दिवसांच्या बाळाचा मृत्यू

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२बेनोडा

जेमतेम २१ दिवसांचे ते बाळ होते. त्याने अजून पूर्णपणे जग पाहिलेही नव्हते. दरम्यान, ज्या माउलीने त्याला जगात आणले त्याच मातेच्या चुकीने त्याला जग सोडावे लागले. बाळाची आई दारूच्या नशेत होती. रात्रीच्या सुमारास दूध पिताना ते बाळ तिच्या अंगाखाली दबले. यात बाळाचा श्वास गुदमरला आणि त्याचा मृत्यू झाला. समाजमन सुन्न करणारी ही घटना पाच दिवसांपूर्वी धामणदस गावात घडली असून मंगळवारी रात्री बेनोडा पोलिसांनी शवविच्छेदन अहवालाच्या आधारे बाळाच्या आईविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

एका २५ वर्षीय महिलेने २६ दिवसांपूर्वी एका गोंडस मुलाला जन्म दिला. पहिलेच बाळंतपण असल्याने ती प्रसूतीनंतर बाळासह माहेरी धामणदस येथे होती. दरम्यान, ६ सप्टेंबरला रात्री ती बाळाला घेऊन खाटेवर झोपली. तिने दारू घेतली होती. त्यामुळे आपल्याच पोटचा गोळा अंगाखाली आला हे तिला सकाळपर्यंत लक्षात आले नाही. सकाळी बाळ रडत नव्हते. त्यामुळे बाळ दगावल्याचे कुटुंबीयांना समजले. त्यानंतर तत्काळ ही माहिती बेनोडा पोलिसांना देण्यात आली. बाळाच्या शरीरावर कोणतेही व्रण नव्हते, मात्र तोंडातून दूध बाहेर आले होते व नाकातून रक्तस्त्राव झाला होता. पोलिसांनी बाळाचा मृतदेह ताब्यात घेत विच्छेदनासाठी पाठवला. अहवालात बाळाचा मृत्यू श्वास गुदमरल्यानेच झाल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी बाळाच्या आईचीसुद्धा वैद्यकीय तपासणी केली. ती झोपली होती तिथे तिने ओकारी केल्याचे दिसत होते. दारूचा वास येत होता. यामुळे ती घटनेच्या दिवशी दारूच्या नशेत होती हे समोर आले. बाळाच्या मृत्यूला जबाबदार असल्याचा गुन्हा आईविरुद्ध दाखल केला असल्याची माहिती ठाणेदार तथा सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानोबा फड यांनी दिली.

अवघ्या तीन फुटांची खाट, बाळ दबल्याचे भानच नव्हते

बाळ आणि त्याची आई हे दोघे तीन फुटांच्या खाटेवर झोपले होते. ती दारूच्या अमलाखाली असल्यामुळे बाळ कधी तिच्या अंगाखाली आले व दबले याचे तिला भानच उरले नाही असेही तपासात समोर येत असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.

संत्रा फळांची होणार तत्काळ ग्रेडींग : नगदी चुकारा देण्याचा अचलपूरमध्ये नवा प्रकल्प

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अचलपूर

संत्रा फळांची तत्काळ ग्रेडींग आणि प्रतिकिलो या दराने खरेदी करुन नगदी चुकारा देण्याचा नवा प्रकल्प अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीने सुरु केला आहे. त्यामुळे यापुढे संत्रा उत्पादकांना केव्हाही संत्रा विक्री करता येणार असून त्यानुसार रक्कम मिळवता येणार आहे.

अचलपुर, चांदुरबाजारसह अंजनगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात संत्रा बागा आहेत. गेल्या कित्येक वर्षांपासून या भागातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हवा तेवढा लाभ या फळबागांपासून होत नसल्याने त्यांचे सतत आर्थिक नुकसान होत आहे. संत्रा खरेदी करताना व्यापाऱ्यांकडून होणारा त्रास, करार करुनही वेळेवर सौदा रद्द करणे, बागेतील संत्रा नेल्यानंतर पैशासाठी त्रास देणे, अशा अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागते.हा त्रास पाहता अचलपूर कृषी उत्पन्न बाजार

समितीचे सभापती, उपसभापती यांच्यासह सर्व संचालकांनी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी बाजार समितीच्या टिएमसी यार्डवर हैद्राबाद येथील चिफो ग्रोटेक कंपनी लि. या कंपनीशी करार करत नवा प्रकल्प उभा केला. यामुळे छोट्या-मोठ्या संत्रा बागायतदारांचा संत्रा ग्रेडींग करत खरेदी केली जाणार आहे. शिवाय त्यांना तत्काळ नगदी चुकारासुध्दा दिल्या जाणार आहे.

अचलपूर तालुक्यातील संत्रा उत्पादनाचे क्षेत्र पाहता संत्रा खरेदीची स्थायी यंत्रणा निर्माण व्हावी व संत्रा फळांना योग्य भाव मिळावा यासाठी बाजार समितीच्या माध्यमातून हा पर्याय उपलब्ध करुन दिला आहे. शेतकऱ्यांकडून आलेल्या फळाची ग्रेडींग करत खुल्या लिलाव पध्दतीने व्यापाऱ्यांनी दर निश्चीत केल्यानंतर किलो प्रमाणे भाव दिल्या जाणार आहे. हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी अत्यंत सोयीचा ठरणार आहे. बाजार समितीने या कंपनीला जागा उपलब्ध करुन दिली असुन कंपनीने त्या ठिकाणी ग्रेडींगची यंत्रणा बसविली आहे, असे समिती प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले. दरम्यान संत्रा आणण्यासाठी कंपनीच्यावतीने कॅरेटची सुविधाही उपलब्ध राहणार आहे. या सुविधेमुळे अल्प क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे.

अजित पवारांच्या दौऱ्यात पोलिसांचे अटकसत्र : निदर्शनासह नागरिकांचा आमदारांवर रोष

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२वरुड

राष्ट्रवादी अजीत पवार गटाचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार हे अलिकडेच त्यांच्या जनसंपर्क यात्रेनिमित्त वरुड दौऱ्यावर आले होते. यावेळी अनेक संघटनांच्या कार्यकर्त्यांची पोलिसांकडून आदल्या दिवसापासूनच धरपकड करण्यात येऊन त्यांना पोलिसांनी नजरकैदेत ठेवले होते. या प्रकाराचा त्या कार्यकर्त्यांनी निषेध नोंदविला असून यामागे आमदार देवेंद्र भुयार यांचे षडयंत्र असल्याचा आरोप लावण्यात आला आहे.

निषेधकर्त्यांच्या मते आमदार देवेंद्र भुयार यांच्याकडूनच ही दडपशाही करण्यात आली. त्यामुळे वेगवेगळ्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत तहसील कार्यालयासमोर निदर्शने केली. तसेच या दडपशाहीविरोधात आमदार देवेंद्र भुयार यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन तहसिलदारांना देण्यात आले. यावेळी शेतकरी संघटनेचे दिलीप भोयर, भाजपाच्या माजी जि. प. सदस्या अर्चना मुरूमकर, माजी नगरसेवक धनंजय बोकडे, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष विजय निकम, रयत क्रांती संघटनेचे विदर्भ प्रमुख ड.आशिष वानखडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

याठिकाणी छोटेखानी सभाही घेण्यात आली. यावेळी बोलताना दिलीप भोयर म्हणाले की,अजित पवार यांच्या दौऱ्यादरम्यान आम्ही कुठलेही आंदोलन करणार नव्हतो. त्याबाबत प्रशासनाला कुठलेही पत्रसुद्धा दिले नव्हते, तरी सुद्धा माझी तब्येत बरी नसताना मला पोलिसांनी घरून ताब्यात घेतले. २०२३ च्या नियमानुसार मंत्र्यांसमोर कोणी निदर्शने करत असतील तर सुरक्षारक्षकांकडून आंदोलकांना अटक करता येते. परंतु, असे काही नसताना केवळ आमदारांच्या दबावाला बळी पडत पोलिसांनी अशाप्रकारे अटक करणे ही बाब चुकीची आहे. पोलिसांनी कर्मचारी म्हणून काम करावे, त्यांनी गुलाम म्हणून काम करू नये, असा सल्लाही त्यांनी दिला.

यंत्रणेने आपले काम केले

या प्रकारावर आमदार देवेंद्र भुयार म्हणाले, ज्या पदाधिकाऱ्यांनी माझ्यावर आरोप केले, ते माझ्यापेक्षा वरिष्ठ आहेत. राहिला प्रश्न दडपशाहीचा तर मी कोणत्याही सुरक्षा यंत्रणेला कुठलाच आदेश किंवा निर्देश दिला नाही. यंत्रणेकडे असलेल्या पूर्वाश्रमीच्या माहितीच्या आधारे त्यांनी त्यांचे काम केले.

तंत्रज्ञानाच्या युगातही जिल्ह्यात 3 लाख ६८ हजार निरक्षर : सर्वांसाठी शिक्षण उपक्रमातून साक्षरतेचे धडे

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

अमरावती तंत्रज्ञानाच्या युगातही सध्या जिल्ह्यात ३ लाख ६८ हजार नागरिक निरक्षर असल्याची नोंद जिल्हा शिक्षण विभागात आहे. या निरक्षरांना साक्षर करण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असून येत्या तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने प्रत्येकाला साक्षर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे जि. प. शिक्षणाधिकारी (योजना) नितीन मानकर यांनी सांगितले आहे. नवभारत साक्षरता कार्यक्रम २०२२ ते २०२७ या कालावधीत १५ वर्षे व त्यापुढील निरक्षर असणाऱ्या व्यक्तींना साक्षर करण्यासाठी राज्याच्या मदतीने केंद्रामार्फत राबवण्यात येत आहे. २०३० पर्यंत जिल्हा १०० टक्के साक्षर करण्याचा शासनाची योजना आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील शिफारशींनुसार व संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येयानुसार २०३० पर्यंत सर्व तरुण, प्रौढ पुरुष आणि महिला अशा सर्वांना १०० टक्के साक्षरता आणि संख्याज्ञान संपादन अपेक्षित आहे. यासाठी प्रौढ शिक्षणाऐवजी सर्वांसाठी शिक्षण हा उपक्रम राबवला जात आहे. यासाठी शाळांमार्फत लाभार्थी निश्चित करून त्यांना स्वयंसेवकांमार्फत साक्षरतेचे

धडे देणे सुरू आहे. त्यांच्या अक्षरांची नोंद उल्हास पवर केली जाते. २०२३-२४ मध्ये जिल्ह्यात एकूण ३० हजार ५५६ इतक्या निरक्षरांची नोंद झाली होती. त्यापैकी २५ हजार ५८२ निरक्षर साक्षरतेचे धडे घेऊन परीक्षेला बसले. त्यापैकी २५ हजार ३१६ उत्तीर्ण होऊन नवसाक्षर झाले. २०२७ पर्यंत जिल्ह्यातील प्रत्येक निरक्षरास साक्षर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करू. नवभारत साक्षरता कार्यक्रम यशस्वी होत असून, निरक्षरांकडूनही उत्तम प्रतिसाद मिळत आहे. विविध स्तरावर नियोजन, निरक्षरांची निवड, शिक्षक व्यवस्था अशी सर्वांगीण तयारी केली आहे. प्रत्येक निरक्षर व्यक्तीला साक्षर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या अनुषंगाने वर्ष २०२४-२५ मध्ये ११ हजार ५५६ निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट मिळाले आहे. पुढील दिवसात सर्व निवडीत निरक्षरांना साक्षरतेचे धडे देण्यात येतील.

> शिक्षण विभागाच्या नवभारत साक्षरता योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात एकही निरक्षर राहणार नाही, यासाठी प्रयत्न केले जातील. जिल्ह्यातील शाळाबाह्य मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीने जिल्हा निरक्षरता शून्य होणे शक्य आहे.
>
> **– बुद्धभूषण सोनोने, शिक्षणाधिकारी, प्राथ. जि.प.**

गणेशोत्सवातून रोजगार; बाजारात लाखोंची उलाढाल वाजंत्री, मंडप डेकोरेशन, केटरर्स, आचारी, व्यावसायिक व्यस्त

अरुण जोशी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

गणेशोत्सवाला शनिवारपासून सुरुवात झाली. जिल्ह्यात १ हजार च्या वर सार्वजनिक मंडळाने गणेशाची स्थापना करण्यात आली आहे. दरम्यान, घराघरातही गणराया विराजमान झाले. यामुळे भाविकांत व बाजारात नवचैतन्य संचारले आहे. बाप्पांच्या आगमनाने रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या. व्यावसायिक, वाजंत्री, मंडप, डेकोरेशन, फळ, फूल विक्रेते, केटरर्स, आचारी, पुरोहित व्यस्त आहेत. विविध साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी होत आहे. गणेशोत्सवाच्या पाच दिवसांत लाखोंची उलाढाल झाली आहे. गणेशोत्सवातून अनेकांना अर्थप्राप्तीचे साधन प्राप्त झाले. अनेकांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटत आहे. गणेशोत्सव सुरू होऊन पाच दिवस लोटले; परंतु, अद्यापही बाजारात गर्दी होत आहे.



रोजगार व व्यवसायाला चालना देणारा उत्सव

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गणेश- मूर्तीची स्थापना झाली. या माध्यमातून होणारी उलाढाल सहजच लक्षात येते. खरेदी-विक्री वाढल्याने व्यापारी व व्यावसा- यिकांत उत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे रोजगार व व्यवसायास चालना मिळत आहे.

प्रत्येक घटकाला होतेय अर्थप्राप्ती

गणेशोत्सवानिमित्ताने मूर्तिकार, वाजंत्री, मंडप, डेकोरेशन, केटरर्स, आचारी, पुरोहित, फळ व फूल विक्रेते, किराणा, अन्य किरकोळ व फुटपाथ व्यावसायिक, मोठे व्यावसायिक तसेच उत्सवांशी निगडित प्रत्येक घटकाला अर्थप्राप्ती होत आहे. गणेशोत्सवात कलाकार, मंडप डेकोरेशन, नेपथ्यकार, वाद्यवृंद, हॉटेल, मेवा-मिठाई आदींच्या रोजगारात भर पडली आहे.

खाद्यपदार्थांची रेलचेल

गणेशोत्सवानिमित्ताने मोदक, लाडू, केळी, काकडी, अन्य फळ, भेल, आइस्क्रीम, पाणीपुरी, चाट, डोसा, कॉर्न, पॉपकॉर्न अशा पदार्थांची मागणी वाढली आहे. राजस्थानी खेळणीची दुकाने सजली, तर बेन्टेक्स ज्वेलरी व्यवसायही जोमात आहे. पूजा साहित्यासह मिठाईच्या दुकानांत सध्या गर्दी बघायला मिळत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थेवर लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय राजवटीमध्ये अधिकाऱ्यांची बडेजावी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती

स्थानिक स्वराज्य संस्थेवर लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय राजवटीमध्ये अधिकाऱ्यांची बडेजावी सुरू आहे. प्रशासनाकडून नागरिकांची कामांसाठी अडवणूक सुरू आहे. याउलट आगामी निवडणुका काही महिन्यांवर आल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक पक्षाच्या नेत्यांनी सार्वजनिक कामांवर भर दिला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तीर्थक्षेत्राच्या सहली, विविध मागन्यासनसाठी मोर्चे,आंदोलने काढून मतदारांना खुश करण्याच्या प्रयत्न लोकप्रतनिधी करू लागले आहेत.

लोकसभा निवडणुकीपूर्वी राम मंदिराचा मुद्दा कळीचा ठरला होता. त्यामुळेच लोकप्रतिनिधी यांनी सार्वजनिक गणेश मंडळे व कार्यक्रमांना देणग्यांचा सपाटा लावला आहे. यंदाच्या गणेशोत्सवात सर्वच गणेश मंडळांची बल्ले बल्ले झाली असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यात पहावयास मिळत आहे.

दुसरीकडे मात्र गेल्या ३ वर्षांपासून लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय अधिकारी ते शिपाईपर्यंत चिरीमिरीचे जाळे भक्कम होत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांची शासकीय कामे रखडली जात आहेत.

शासकीय कार्यालयात हेलपाटे वाढले

सर्वसामान्यांच्या जीवनाला अनुसरून अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गोष्टी पुरवतानाच भ्रष्टाचार होताना दिसतो. शासनामार्फत पुरवण्यात येणाऱ्या धान्यामध्ये अफरातफर होते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मुखापर्यंत अन्न जातच नाही. महसूलमधील सर्वच विभागात वजन ठेवल्याशिवाय फायली पुढे सरकत नाहीत. शासनाच्या विविध योजनेचा फायदा मिळण्यापेक्षा पूर्ततेसाठी शासकीय कार्यालयात लागणारा वेळ आणि या ठिकाणी चाललेल्या भ्रष्टाचारामुळे योजनेचा फायदा तर मिळतच नाही उलट सर्वसामान्यांना प्रशासकीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात.

चोरावर मोर

प्रशासकीय आणि निमप्रशासकीय कार्यालयातील भोंगळ कारभाराचा फायदा काही जण सामाजिक कार्याच्या नावाखाली उठवतात. नामधारी नेते माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवून समोरील व्यक्तींना लक्ष्य करून पैसे उकळण्याचा धंदा सध्या जिल्ह्यात जोऱ्यात सुरु आहे.

रेल्वेच्या खाजगीकरणा विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

जनहितार्थ विविध मागण्यांकरिता आज नवजागरण मनिषी व क्रांतिकारी स्मरण समितीचे ऑल इंडिया डेमोक्रॅटिक युथ ऑर्गनायझेशन च्या आव्हानावरून रेल्वेच्या खाजगीकरणावर प्रतिबंध लावण्यासाठी व विविध मागण्याकरिता आज अखिल भारतीय विरोध दिवस ठेवण्यात आला होता. त्याच अनुषंगाने नवजागरण मनिषी व क्रांतिकारी स्मरण समितीच्या वतीने आज दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. सद्याचे सरकार हे संपूर्ण देशाला खाजगीकरणाच्या हातामध्ये देण्याचा कट रचत आहे. याच क्रमामध्ये रेल्वेच्या खाजगीकरणाची सुरुवात झालेली आहे. आज रेल्वेमध्ये ३.५ लाखापेक्षा जास्त पदे रिक्त आहेत ते भरणे तर दूरच परंतु जे नोकरी करीत आहे त्यांनाही काढण्यात येत आहे. आज मेल व एक्सप्रेस रेल्वेंमध्ये जनरल बोगी तसेच स्लीपर बोगीची संख्या वाढवणे गरजेचे आहे. तेथे तसे न करता त्यांची संख्या कमी करून AC कोच ची संख्या वाढविली जात आहे. त्यामुळे जनतेला कोंबून जाण्यास भाग पाडल्या जात आहे. त्यामुळे सरकारने रेल्वेचे खाजगीकरण थांबवावे, प्रीमियम तत्काळच्या नावावर जनतेची लूट बंद करावी, जेष्ठ नागरिकांना मिळणारी सवलत पुन्हा सुरू करा, रेल्वेच्या रिक्त जागा तात्काळ भरण्यात याव्यात, इत्यादी मागण्या यावेळी करण्यात आली आहे.

झाड तोडाल तर ५० हजार दंड!, राज्यपालांनी कायद्यातील सुधारणेचा अध्यादेश लागू केला

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती

शासनाची परवानगी न घेता झाड तोडण्याचा विचार करत असाल तर तो सोडून द्या. कारण राज्यपालांनी याबाबतच्या कायद्यात सुधारणा करणारा अध्यादेश लागू केला आहे. त्यानुसार बेकायदेशीरपणे झाड तोडणाऱ्याला एक हजार रुपये नव्हे तर तब्बल ५० हजार रुपये दंड करण्याची तरतूद झाली आहे.

महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत अधिनियम १९६४ मध्ये सुधारणा करणारी तरतूद लागू झाली आहे. त्यानुसार पूर्वी ग्रामीण भागात बेकायदेशीर वृक्षतोड झाल्यास कमाल एक हजार रुपये दंड करण्याची तरतूद होती. त्यामध्ये गेल्या ६० वर्षांत कोणतीही सुधारणा करण्यात आली नव्हती. पर्यावरण रक्षण करण्यासाठी अशा बेकायदा वृक्षतोडीला चाप बसवणे गरजेचे होते.नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दंडाची रक्कम ५० हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. राज्यपालांनी याबाबतच्या कायद्यातील सुधारणेचा अध्यादेश जारी केला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा झाली असली तरी हा कायदा महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती या क्षेत्राला लागू नाही.

जाळणे, कापणे, छाटणे म्हणजेच झाड तोडणे!

दंडाची रक्कम वाढवण्याबरोबरच कोणती कृती झाड तोडणे या व्याख्येत बसते हेही स्पष्ट केले आहे. त्यानुसार झाड मारून टाकण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळणे, कापणे, छाटणे, बुंध्याभोवतीची साल कोरणे किंवा झाडाची साल काढणे हे झाडाला उपद्रव देणारे प्रकार झाड तोडण्याच्या व्याख्येमध्ये समाविष्ट केले आहेत. वृक्ष अधिकारी चौकशी केल्यानंतर आणि अशा व्यक्तीस बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर दंड करेल, असेही अध्यादेशात म्हटले आहे.

पोषण आहाराचे १२ मेन्यू; गुरुजींचे वाढले टेन्शन; शिक्षण विभागाचे मार्गदर्शनच नाही

१२ मेन्यू शिक्षकांसाठी ठरत आहे डोकदुखी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती

इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या अंतर्गत आठवडाभर दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासाठी आता शिक्षण विभागाने १२ मेन्यूचे प्रकार ठरवून दिले. प्रत्येक दिवशीचे मेन्यू कार्ड शिक्षक, मुख्याध्यापकांना दिले आहे. मुलांना पोषण आहार मिळत असला, तरी १२ मेन्यू शिक्षकांसाठी डोकदुखी ठरत आहेत.

विद्यार्थ्यांना पोषण आहारात सतत खिचडी दिली जात असल्यामुळे आता आहारात वैविध्य आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून वैविध्यपूर्ण पाककृतींचा समावेश केला. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून मेन्यूचा निर्णय चांगला असला, तरी कडधान्य, तेल, मसाले, तांदूळ यांचा हिशेब ठेवावा लागणार आहे. तो कसा ठेवावा? असा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला आहे. शिक्षण विभागाने त्याविषयी कोणतेही मार्गदर्शन केले नसल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे.

कधीपासून करणार सुरू

शालेय शिक्षण विभागाने पोषण आहारामध्ये १२ मेन्यू वापरण्याचे निर्देश ६ सप्टेंबर रोजी दिले आहेत. त्यानुसार प्राथमिक शिक्षण विभागाने मंगळवारी सर्व केंद्र प्रमुख, गटशिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठवून पोषण आहार देण्यास सांगितले आहे.

या आहेत अडचणी

नाचणीसत्व, दूध पावडर, साखर, गुळ, सोयाबीन वडी, कांदा, लसूण, तेल, जिरे, कडधान्य आदी साहित्याचा पुरवठा झालेला नाही. दिवसभरातून तीनवेळा मुलांना नाचणीसत्व, तांदळाची खीर, पुलाव, मोड आलेले कडधान्य द्यावे लागेल. नाचणी सत्व हे अन्नधान्य महामंडळाकडून पुरविण्यात येणार आहे. मात्र, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीने वरील साहित्य खरेदी करून बिल सादर करायचे. शिक्षण संचालकांमार्फत त्याची रक्कम देण्यात येईल. तसेच हिशोब ठेवून बिले जमा करायची. त्यांची वही, रजिस्टरमध्ये नोंद करायची.

कोणत्या पाककृती ?

पोषण आहारामध्ये भाज्यांचा पुलाव, मसाले भात, मटार पुलाव, मूगडाळीची खिचडी, चवळी खिचडी, चणा पुलाव, सोयाबीन पुलाव, मसूर पुलाव, मटकीची उसळ, गोड खिचडी, मूग शेवगा, वरण-भात, तांदळाची खीर, नाचणीचे सत्त्व, मोड आलेले कडधान्य आदी पदार्थांचा समावेश आहे.

'एमपीएससी'च्या विद्यार्थ्यांची चिंता वाढणार, सर्वच परीक्षा लांबणार?

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

महाराष्ट्र सरकारने दिलेल्या मराठा आरक्षणाची अंमलबजावणी २६ फेब्रुवारीपासून करण्यात आली आहे. शासनाने तसा जीआर काढला असून अंमलबजावणीबद्दलच्या तरतुदी सांगितल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण अधिनियम २०२४ नुसार 'सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग' निर्माण करण्यात आला आहे. त्यानुसार या वर्गासाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. मात्र, हे आरक्षण लागू झाल्यानंतर त्याचा परिणाम एमपीएससीच्या विविध जाहिरातींवर झाला असून त्याचा परीक्षांवर काय परिणाम होणार याविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊया.

परीक्षा लांबणीला सुरुवात

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ साठी पुन्हा शुद्धिपत्रक जाहीर करून त्यामध्ये 'कुणबी नोंदी'च्या आधारे इतर मागासवर्गाचे (ओबीसी) जात प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना नव्याने अर्ज करण्याची संधी दिली. त्यामुळे पूर्व परीक्षा आता ६ जुलै ऐवजी २९ जुलैला घेण्यात येणार होती. शासनाने दिलेल्या सूचनांच्या आधारे 'एमपीएससी'ने हा निर्णय घेतला होता. त्यानंतर पुन्हा शुद्धीपत्रक काढून पुन्हा अर्जाची संधी देण्यात आल्याने त्याचा परिणाम परीक्षेवर पडून ती २५ ऑगस्टला होणार होती. मात्र, विद्यार्थी आंदोलनामुळे ती पुन्हा पुढे गेली.पुढील काही महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका असून आचारसंहिता लागू होणार आहे. त्याचा परिणाम या परीक्षांवर होणार आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने या काळात परीक्षा होणे अशक्य आहे.

आमदार रवि राणांनी केली विसर्जन स्थळांची पाहणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२ अमरावती

आमदार रवी राणा यांनी मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांच्यासह आज छत्री तलाव,प्रथमेश,वडाळी,कोंडेश्वर तसेच झिरी दत्त मंदिर विसर्जन स्थळांची पाहणी, मंडळाचे तसेच घरगुती श्री गणेश मूर्ती विसर्जन शांततेने व सुरळीतपणे व्हावे यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश हि दिलेत.

संपूर्ण राज्यात गणेशोत्सव अत्यन्त उत्साहात साजरा होत आहे,गणेश विसर्जन हे अत्यंत चांगल्या पद्धतीने नागरिकांना त्रास न होता,कुठलीही दुर्घटना न होता व्हावे यासाठी प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी तसेच या सर्व स्थळाकडे जाणारे रस्ते चांगले करावे,प्रकाश व्यवस्था चांगली असावी,आरोग्य चमू तैनात असावी,अग्निशमन दल, सुरक्षा यंत्रणा सज्ज असावी, तसेच नागरिकांना सूचना देण्यासाठी लाऊडस्पीकर ची व्यवस्था असावी अश्या सूचना आमदार रवी राणा यांनी दिल्या, तसेच पोलीस यंत्रणेला वाहतूक नियोजन योग्य पध्दतीने करण्याचे निर्देश आमदार रवी राणा यांनी दिले

यावेळी आमदार रवी राणा यांच्या समवेत मनपा आयुक्त सचिन कलंत्रे,डीसीपी गणेश शिंदे,सहायक उपायुक्त नरेंद्र वानखडे,मनपा दस्तुर नगर झोनचे श्री बोबडे, सहायक झोन श्री तीखीले, सहायक आयुक्त गायकवाड मॅडम, अतिक्रमण विभागाचे श्री कोल्हे,श्री हडाले, नितीन बोरेकर, अग्निशमन कर्मचारी आदी सह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

व्यवस्था परिवर्तन नागरी कृती समितीचे राजकमल चौकात आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१२अमरावती

महानगर पालिकेने शहरातील ३ लाख पेक्षा अधिक मालमत्तां धारकांवर लावलेल्या भरमसाठ घर टॅक्स वाढ रद्द करण्यात यावी यामागणीसाठी आज व्यवस्था परिवर्तन नागरी कृती समितीच्या वतीने दुपारी १२ वाजता राजकमल चौकात घोषणाबाजी करत घर टॅक्स वाढीचा निषेध करण्यात आला. घर टॅक्स वाढी विरोधात नागरी कृती समितीने केलेल्या आंदोलनाची दखल अमरावती,

बडनेरा मतदार संघाच्या आमदारांनी घेत मंत्रालयातून घर टॅक्स वाढीला स्थगिती मिळविली. मात्र मिळालेल्या स्थगितीवर न थांबता सर्व लोकप्रतिनिधींनी वाढीव घर टॅक्स रद्द करण्यासाठी प्रयत्न करावा. जोवर वाढीव घर टॅक्स रद्द होणार नाही तोवर नागरी कृती समितीचा लढा सुरूच राहणार असल्याचे आंदोलकांनी बोलतांना सांगितले.